


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २५
www.ramprahar.com

रविवार, ११ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

नोकरीच्या बहाण्याने महिलेवर अत्याचार/२
पोलादपूरजवळ कत्तलीसाठी गुरे नेणाऱ्यांचा प्रयत्न फसला/५
पॅरिस ऑलिम्पिक : कुस्तीतही भारताने जिंकले पदक/८



## ‘मविआ’ने माझ्या अटकेसाठी अनेक प्रयत्न केले -देवेंद्र फडणवीस

**नागपूर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या काळात तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना विविध प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि त्यामागे गृहमंत्री अनिल देशमुख होते, असा आरोप मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी केला आहे. यावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले माजी पोलीस आयुक्त परमबिर सिंग जे काही बोलले ते खरे आहे. माझ्या अटकेसाठी मविआ सरकारने काही अधिकाऱ्यांना सुपारी दिली होती आणि मला अडकवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, मात्र आम्ही त्याचा पर्दाफाश करू शकलो.

उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी त्यांना परमबीर सिंह यांनी अनिल देशमुखांवर केलेल्या आरोपांबाबत विचारण्यात आले. या वेळी ते म्हणाले, परमबीर सिंह यांनी मला आणि भाजपाच्या नेत्यांना अटक करण्यासंदर्भात जो दावा केला आहे. तो खरा आहे. त्यांनी फक्त एकच घटना सांगितली आहे, मात्र मला अटक करण्याचा प्रयत्न एकदा नाही, तर चार वेळा झाला. खोट्या केस करून मला कशी अटक करता येईल, याचे षडयंत्र झाले, पण त्यावेळी आम्ही त्याचा खुलासा करू शकतो. त्याचे पुरावे आम्ही सीबीआयला दिले, त्याचे पुरावे आजही आमच्याकडे आहेत, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

एक गोष्ट निश्चितपणे सांगतो, की महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये माझ्यासह भाजपच्या अनेक नेत्यांना तुरुंगात टाकण्याची सुपारी काही पोलीस अधिकाऱ्यांनी दिली होती. त्यांनी ती सुपारी घेतलीदेखील होती, पण त्यांना यश मिळाले नाही. कारण काही चांगल्या अधिकाऱ्यांनी असे खोटे गुन्हे दाखल करण्यास नकार दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

### ‘मुख्यमंत्री शिंदेंनाही अडकवण्याचा प्रयत्न झाला’

याशिवाय आश्चर्याची बाब म्हणजे याच प्रकरणात तत्कालिन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनाही अडकवण्याचा प्रयत्न झाला. त्यांना अटक करण्यासाठी संजय पांडे यांनी सरदार पाटील यांना निर्देश दिले होते. याचाच अर्थ तेव्हाच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या मंत्र्यांना अटक करण्याचा प्रयत्न केला होता, असा दावाही मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी केला आहे.

## नवी मुंबई विमानतळाचे काम लवकर पूर्ण करून ‘दिबां’चे नाव द्यावे -खासदार बारणे

**चौक : प्रतिनिधी**

नवी मुंबई विमानतळाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून लोकनेते दि.बा पाटील यांचे नाव द्यावे, अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे. केंद्र शासनाच्या वतीने लोकसभेत मांडण्यात आलेल्या भारतीय विमान विधेयक २०२४ वर चर्चेत भाग घेताना त्यांनी ही मागणी केली. या संदर्भात सर्वपक्षीय कृती समितीने सातत्यपूर्ण प्रयत्न व पाठपुरावा केलेला आहे.

पुणे व मुंबई विमानतळावरील वाढता ताण कमी करण्यासाठी पनवेलमध्ये होत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम शासनाने लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली.

खासदार बारणे म्हणाले की, भारतात १५७ विमानतळ आहेत. वाढत्या लोकसंख्येनुसार विमानतळे वाढण्याची आवश्यकता आहे. एका अहवालानुसार १६ कोटी लोक विमानाने प्रवास करत आहेत. तीन कोटी लोक पहिल्यांदा प्रवास करत आहे. २०३०पर्यंत



विमानाने प्रवास करणाऱ्यांची संख्या ३० कोटींपर्यंत जाऊ शकते.

जानेवारी ते जून २०२४ दरम्यान सात कोटी ९३ लाख लोकांनी देशाअंतर्गत विमान प्रवास केला. गेल्यावर्षी सात कोटी ६० लाख लोकांनी प्रवास केला होता. काही खासगी कंपन्या विमानाचे उड्डाण रद्द केल्यानंतर त्याचे पैसे परत करत नाहीत. मनमानी केली जाते. हे टाळण्यासाठी नवीन विमानतळे झाली पाहिजेत, असे बारणे म्हणाले. **(पान २ वर..)**

## पंतप्रधान मोदींकडून वायनाडमध्ये भूस्खलनग्रस्त भागांची पाहणी



**वायनाड : वृत्तसंस्था**

केरळमधील वायनाड जिल्ह्यातील भूस्खलन झालेल्या ठिकाणी शनिवारी (दि. १०) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट दिली. त्यांनी चुरलमला येथे जाऊन आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. पंतप्रधान मोदी कन्नूर विमानतळावरून हवाई दलाच्या हेलिकॉप्टरने वायनाडला पोहचले. ३० जुलै रोजी झालेल्या भूस्खलनामुळे प्रभावित झालेल्या चुरलमला परिसरात नुकसानीचा त्यांनी आढावा घेतला. यापूर्वी पंतप्रधान मोदींनी भारतीय वायुसेनेच्या हेलिकॉप्टरद्वारे भूस्खलनग्रस्त चुरलमाला, मुंडक्काई आणि पंचिरिमट्टमचे हवाई पाहणी केली होती.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हवाई पाहणीनंतर पंतप्रधान मोदींचे हेलिकॉप्टर कलपेट्टा येथील एसकेएमजे विद्यालयात उतरले. येथून ते रस्त्याने चुरलमला येथे रवाना झाले. या पुलावरून पायी गेले. पंतप्रधान मोदींनी बचाव कर्मचारी, राज्याचे मुख्य सचिव व्ही वेणू आणि जिल्हा अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

## अभिनेते विजय कदम यांचे निधन



**मुंबई :** रंगभूमी ते चित्रपट, मालिका अशा विविध माध्यमांत लोकप्रिय ठरलेले अभिनेते विजय कदम (वय ६७) यांचे शनिवारी (दि. १०) सकाळी अंधेरी येथे निधन झाले. ऐंशी ते नव्वदच्या दशकांत विजय कदम यांनी रंगभूमीवर केलेल्या कामाने त्यांना खरी ओळख मिळवून दिली. त्यांनी वैविध्यपूर्ण भूमिका केल्या असल्या तरी विनोदी अभिनेता म्हणून ते अधिक लोकप्रिय ठरले.

## धाकटा खांदा येथे विद्यार्थ्यांचा गुणगौरव, छत्रीवाटप

■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याअंतर्गत स्थायी समिती माजी सभापती मनोहर म्हात्रे आणि धाकटा खांदा रत्नदीप स्पोर्ट्स क्लबच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि शाळेतील विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे आयोजन धाकटा खांदा येथील पनवेल महापालिकेच्या श्री गणेश विद्या मंदिर प्राथमिक शाळा क्रमांक ६ येथे शनिवारी (दि. १०) करण्यात आले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि ज्येष्ठ नागरिकांना तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना छत्रीचे वाटप, दहावी ते बारावीमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच श्री गणेश विद्यामंदिर शाळेच्या युटच्युब चॅनेल, इंस्टाग्राम अकाउंट आणि फेसबुक पेजचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, मोतीलाल कोळी, मुख्याध्यापिका सुमन हिलम, ज्योत्स्ना मॅडम, वैभव पाटील, अश्विनी भोईर, काकडे, वैशाली म्हात्रे, कांचन पाटील, शैला कांबळे, रमेश पाटील, रेपाळे, दलाल यांच्यासह शिक्षकवृंद आणि मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, या वेळी शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## निवडक

### डॉक्टर तरुणीची निर्घृण हत्या

**कोलकाता :** येथील सरकारी रुग्णालयात एका डॉक्टर तरुणीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी संजय रॉयला अटक केली आहे. पोलिसांनी आरोपीला सियालदह न्यायालयात हजर केले. चौकशीसाठी न्यायमूर्तींनी फिर्यादीची विनंती मान्य करत आरोपीला २३ ऑगस्टपर्यंत कोठडी सुनावली आहे. चौकशी अहवालानुसार, रक्ताच्या थारोळ्यात असलेल्या मृतदेहावर अनेक जखमा होत्या. तर मृतदेहावर अर्धवट कपडे होते. या घटनेमुळे हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांनी संताप व्यक्त केला.

### विमान अपघातात ६२ जणांचा अंत

**ब्राझिलिया :** ब्राझीलमधील वुईपास एअरलाईन्सचे विमान साओ पाऊलोजवळील विनहेडोत कोसळले. या अपघातात ६२ जणांचा मृत्यू झाला. पैकी ५८ प्रवासी होते, तर चार जण कर्मचारी होते. हे विमान कास्कावेलहून ग्वारुलहोसला जात होते. वुईपास एअरलाईन्सने दिलेल्या माहितीनुसार, विमान एका रहिवासी भागात कोसळले. एका घरापासून अगदी काही अंतरावर विमान जमीनदोस्त झाले. त्यानंतर विमानाने पेट घेतला.

## रायगड जिल्हा पोलीस दलातील भरतीसाठी लेखी परीक्षा शांततेत



(छाया : जितू शिगवण)

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर सर्वसाधारण पोलीस शिपाई ३९१ पदांकरीता लेखी परीक्षा शनिवारी (दि. १०) शांततेत पार पडली अलिबाग व पेणमधील ११ केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली. तीन हजार ५७२ पुरुष व एक हजार १७५ महिला असे एकूण चार हजार ७४७ उमेदवार या लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले होते.

केंद्र जे.एस.एम. कॉलेज, अलिबाग, अॅड दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ, के. ई.एस. जनरल अरुणकुमार वैद्य मध्य. शाळा अलिबाग श्रीमती जा.र.ह. कन्या शाळा अलिबाग, सेंटमेरी हायस्कुल अलिबाग, श्री. चिंतामणराव केळकर विद्यालय, अलिबाग, पी. एन.पी. कॉलेज, वेश्वी, अलिबाग, प्रायव्हेट हायस्कुल ज्युनिअर कॉलेज, पेण, सौ.एम.एन. नेने कन्या विद्यालय, पेण डॉ. पतंगराव कदम आर्ट अॅण्ड कॉमर्स कॉलेज, पेण, सार्वजनिक विद्यामंदिर अॅण्ड ज्युनिअर, पेण या केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली.

**गैरप्रकार करणारे सहा जण ताब्यात**

दरम्यान, रायगड जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर सर्वसाधारण पोलीस शिपाई ३९१ पदांकरीता घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत सहा उमेदवारांच्या कानामध्ये इलेक्ट्रॉनिक यंत्र आढळून आले. त्यामुळे त्यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांची चौकशी सुरू आहे.

## नवीन पनवेलमध्ये एआय एक्सपेरिमेंटल लॅब सुरू

### आधुनिक तंत्रज्ञानाची होणार ओळख



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वेध घेत नेहमीच विविध कोर्सेस आणि त्या अनुषंगाने प्रयोग करणाऱ्या आणि संगणक क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या ’शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी’ या संस्थेचा रौप्य महोत्सव माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि. १०) नवीन पनवेल येथे मोठ्या उत्साहात झाला.

या वेळी आधुनिक तंत्रज्ञान प्रणाली असलेल्या ’एआय एक्सपेरिमेंटल लॅब’चे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या लॅबमुळे आता विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होणार असून शिक्षण क्षेत्रातील आणखी एक पर्वणी मिळाली आहे. काळानुसार होणाऱ्या बदलाची योग्य वेळी चाहूल लागून संगणकाचे ज्ञान घराघरातील सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि सी-डॅकचे तत्कालीन प्रमुख विवेक सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली १० ऑगस्ट १९९९ रोजी शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी या संस्थेची जयंत भगत यांच्या नेतृत्वाखाली स्थापना झाली आणि या संस्थेला अल्पावधीतच मोठे यश मिळाले.

**(पान २ वर..आणि छायाचित्र पान ६ वर..)**



# नवीन करप्रणालीबाबत सीएंनी मार्गदर्शन करावे- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**नागपूर : प्रतिनिधी**

वस्तू व सेवा कर रचनेमुळे (जीएसटी) देशात अनेक सकारात्मक बदल झाले आहेत. गत सात वर्षांत देशाच्या करामध्ये दुपटीपेक्षा वाढ झाली. यानुरूप नवीन कायदे आले. कर विषयक कायदे, आर्थिक जबाबदारी याविषयी जनसामान्यांना साक्षर करुन सर्वांना आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी चार्टर्ड अकाउंटंट्स (सीए) यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.१०)येथे केले.

द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) नागपूर शाखेच्या वतीने सेंटर पॉइंट हॉटेलमध्ये आयोजित दोन दिवसीय विदर्भ कॉन्क्लेवचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी ते बोलत होते. आयसीएआयच्या नागपूर शाखेचे प्रमुख अक्षय गुल्हाने यांच्यासह वरिष्ठ पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशात जीएसटीच्या माध्यमातून नवी करप्रणाली लागू झाली व अर्थव्यवस्थेमध्ये सकारात्मक बदल घडून आले. भारतामध्ये करप्रणाली यशस्वी होण्याबद्दल जगातील बड्या देशांना साशंकता निर्माण झाली होती, मात्र जीएसटीच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे व देशात निर्माण झालेल्या जीएसटीएन नेटवर्कमुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर संकलनाची सुदृढ पद्धत निर्माण झाली आहे व देश जागतिक अर्थव्यवस्थेत अग्रणी स्थानावर आला आहे. भारतात सीएंची महत्त्वाची भूमिका आहे. अकाउंटंटस्सोबत अकाउंटीबिलीटी अर्थात जबाबदारीही जुळली आहे. ही जबाबदारी समाजाला दिशा देत असते हे लक्षात घेत या नव्या करप्रणालीमुळे झालेल्या सर्व आर्थिक बदलांचा स्वीकार करीत आयसीएआयने या करप्रणालीबाबत सर्वसामान्यांना साक्षर करावे, असेही त्यांनी सांगितले.

करप्रणालीसह गरीबी निर्मूलनात देशाची वाटचाल सुरु आहे. गेल्या १० वर्षात २५ कोटी लोकांना गरिबीमुक्त केले आहेत. नव्या करप्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीतून महाराष्ट्राची आर्थिक घोडदौड सुरु आहे. वर्ष २०२८-२९ पर्यंत ५०० ट्रिलियनची अर्थव्यवस्था बनविण्याच्या दृष्टीने योजनाबद्धरित्या कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

जगात व देशात तंत्रज्ञान व आधुनिकतेची संक्रमण अवस्था असून निर्मितीकेंद्रीत उद्योग व स्पीड ऑफ डेटाला महत्त्व प्राप्त झाले आहे. देशात व राज्यात ५जी नेटवर्क आले आहे व लवकरच ६जी नेटवर्कही येणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वापराद्वारे विविध क्षेत्रात सकारात्मक बदल घडत आहेत. राज्यशासनानेही याचा स्वीकार करत आगेकूच केली आहे. राज्याच्या जीएसटी प्रणालीतही एआयचा उपयोग होत आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती मिळाली आहे. नुकतेच 'नागपूर-वर्धा नॅशनल लॉजिस्टीक हब' उभारण्यासंदर्भात राज्य शासनाने मोठा निर्णय घेतल्याचे सांगत यामुळे विदर्भ व राज्याच्या विकासाला गती मिळणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

# नोकरीच्या बहाण्याने महिलेवर अत्याचार

## कळंबोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्रातील नवी मुंबईत महिलांवरील वाढत्या अत्याचाराबाबत चांगलाच गदारोळ सुरू आहे. दरम्यान, कळंबोली येथे एका व्यक्तीने एका महिलेला आपल्या घरी बोलावून तिला नर्सिंगची नोकरी लावून देण्याच्या नावाखाली चहा दिला. चहा पिऊन महिला बेशुद्ध झाली आणि नराधमाने तिच्यावर अत्याचार करून फोटो व्हिडीओ बनवला.



महिलेला शुद्ध येताच त्या व्यक्तीने तिचा फोटो आणि अश्लिल व्हिडीओ दाखवला आणि तो व्हायरल करण्याची धमकी देऊ लागला. व्हिडीओ व्हायरल न केल्याच्या बदल्यात त्या व्यक्तीने महिलेकडे पैशांची मागणी करण्यास सुरुवात केली. व्हिडीओ व्हायरल होऊ नये म्हणून ती महिला त्या व्यक्तीला पैसे देत राहिली. महिलेने त्या व्यक्तीला तीन लाख रुपये दिले. व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन त्या व्यक्तीकडून महिलेला ब्लॅकमेल केले जात होते, या भीतीने महिलेने घरात ठेवलेले सर्व दागिने घेऊन त्या व्यक्तीला दिले. हा नराधम महिलेला आयआयएफएल गोल्ड लोन कंपनीत नेऊन सोने ठेवायचा आणि पैसे काढून घेत असे, अशाप्रकारे हा व्यक्ती महिलेला सुमारे १३ तोळे सोने घेऊन ब्लॅकमेल करीत होता. सर्व काही आटोपल्यानंतर त्या व्यक्तीने पुन्हा महिलेवर पैशांसाठी दबाव टाकला तेव्हा महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केला, मात्र तिच्या कुटुंबीयांनी तिला रोखले. चौकशी केली असता महिलेने तिच्या कुटुंबियांना हकीकत सांगितली, त्यानंतरच कुटुंबीय महिलेला कळंबोली पोलीस ठाण्यात घेऊन गेले.

या प्रकरणाची कळंबोली पोलिसांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांनी तत्काळ दखल घेतली आणि गुन्हा दाखल करण्यात आला. सध्या आरोपी फरार असून पोलीस आरोपीचा शोध घेत असून पुढील तपासात व्यस्त आहेत.

# आदिवासी युवकाची जि.प. बांधकाम विभागात नियुक्ती

**अलिबाग : प्रतिनिधी**

युवक-युवतींना शिक्षणानुरूप रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी राज्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील अलिबाग वाघोली येथील चैतन्य अनिल पवार या २८ वर्षीय आदिवासी युवकाची जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात नियुक्ती करण्यात आली आहे. चैतन्य पवार याने शिक्षण स्थापत्य अभियांत्रिकी पदवीपर्यंत झाले असून गुरुवारी (दि. ८) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते त्याला नियुक्तीपत्र देण्यात आले.

राज्यातील उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध आहे, मात्र युवकांना शिक्षणानंतर अनुभवाअभावी पूर्णवेळ रोजगार मिळण्यात अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार मिळविण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अहर्तेप्रमाणे म्हणजे बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सहा हजार, आयटीआय, पदविकाधारक विद्यार्थ्यांना आठ हजार, तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना १० हजार विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत शासनाच्या विविध विभागांमध्ये युवकांची नियुक्ती करण्यात येत आहे. इच्छुक युवकांनी शासकीय कार्यालयात प्रत्यक्ष संपर्क साधून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे. या वेळी जिल्हा कौशल्य विकास यंत्रणा सहाय्यक आयुक्त अमिता पवार, जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव उपस्थित होते.

### योजनेसाठी आवश्यक पात्रता

**उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्षे असावे. किमान शैक्षणिक पात्रता बारावी पास, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर असावी, मात्र शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. त्याची आधार नोंदणी असावी. त्याचे बँक खाते आधार संलग्न असावे. उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करून रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.**

# ॲक्टीव्हा स्कुटीची चोरी

**पनवेल** : शहरातील नंदनवन बिल्डींगसमोरील रस्त्यावर उभी करून ठेवलेली होंडा कंपनीची ॲक्टीव्हा स्कुटी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. संजय पाटील यांनी त्यांची १५ हजार रुपये किंमतीची जुवाकिसु होंडा ॲक्टीव्हा स्कुटी (एमएच ४६ बीसी१२२५) ही सदर ठिकाणी उभी ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलात नऊ महिला कर्मचारी रुजू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलात प्रथमच महिला कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे. यानुसार नऊ महिला अग्निशमन कर्मचारी कामावर रुजू झाल्या आहेत. नुकतेच आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त कैलास गावडे यांच्या माध्यमातुन या नव्याने रुजू झालेल्या महिला कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्र वितरित करण्यात आले.

या महिला कर्मचाऱ्यांमध्ये रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये शुभांगी संतोष घुले, तेजश्री जनार्धन साळुंखे, तेजस्विनी दशरथ कवाळे, पल्लवी राजेंद्र जगाळे, संचिता नरेंद्र विचारे, प्रणाली अशोक रंटेला, रुपाली वासुदेव महातो, गीतांजली भाऊराव पाटील, पायल प्रमोदराव नलाट या नऊ महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

अग्निशमन कर्मचारी, यंत्रचालक, चालक आदी पदांवर या कर्मचारी कार्यरत असणार आहेत. त्यामुळे यापुढे अग्निशमन दलामध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला कर्मचारीदेखील नागरिकांना दिसून येतील.

या भरतीपूर्वी पारदर्शक पद्धतीने मैदानी चाचणी कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये झाली. या वेळी राज्य भरतील पुरुष व महिला उमेदवारांनी मोठी गर्दी केली होती. रिक्त जागांवर पुरुष उमेदवारांचीदेखील भरती करण्यात आली.

### *प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची दस्तऐवज पडताळणी*

***पालिकेने टीसीएसच्या माध्यमातून ३७७ पदांसाठी पारदर्शकपणे नोकरभरती पार पडली. २१९ उमेदवारांनी नियुक्ती आदेश स्वीकारले असून १८३ कर्मचारी सेवेत रुजू झाले आहेत. ९३ प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना ९ ऑगस्ट रोजी दस्तऐवज पडताळणीसाठी बोलावले होते. पालिकेच्या माध्यमातुन राबविण्यात आलेली सरळसेवा भरती प्रक्रिया अत्यंत सुरळीतपणे व पारदर्शकपणे पार पाडण्यात येत आहे.***

# पोसरी येथे शिवसेनेतर्फे नोकरी मेळावा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे यांच्यामार्फत नोकरी तुमच्या दारात ही संकल्पना घेऊन मतदारसंघातील तरुण तरुणींसाठी नोकरी मेळावा शिवसेनेच्या माध्यमातून रविवारी (दि.१८) पोसरी शिवतीर्थ येथे आयोजित केला आहे. यानिमित्त शनिवारी पत्रकार परिषदेत या भव्य नोकरी मेळाव्याच्या वेबसाईट व संपर्क कार्यालयाचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी जिल्हाप्रमुख संतोष भोईर, विधानसभा संपर्कप्रमुख पंकज पाटील, विधानसभा संघटक शिवराम बदे, माजी तालुका प्रमुख बाळाजी विचारे, माजी नगरसेवक ॲड. संकेत भासे, शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, संघटक दिनेश कडू तसेच अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले की, अडीच वर्षांपूर्वी कोविडचे संकट देशात आले, त्या वेळी लॉकडाऊनमुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. येथे बेरोजगारी वाढली. म्हणून पुन्हा एकदा सर्वांना नोकरी मिळण्यासाठी माझे प्रयत्न असल्याचे त्यांनी जाहीर केले. भव्य दिव्य असा नोकरी मेळाव्याचे नियोजन करण्यात आले असून १० हजार तरुण तरुणींना नोकरी देणार आहोत. यासाठी ५० ते ७० कंपन्या, बँक या मेळाव्यात समाविष्ट होणार आहेत. यासाठी आपला बायोडाटा घेवून या, पाचवी शिक्षण पासून ते पुढील शिक्षण घेतलेल्या सर्वांना नोकरी यात मिळणार असल्याने सर्वांनी फायदा घ्या, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

# मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेची नवी मुंबईकरांनी घेतली माहिती

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने राज्यातील सर्व धर्मियांमधील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थदर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ नवी मुंबईतील जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी घ्यावा यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात योजनेची माहिती देण्यासाठी ज्येष्ठ नागरिक संघांच्या पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होते.



या बैठकीस महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ, ज्येष्ठ नागरिक संघ नेरूळ तसेच महापालिका क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रांचे पदाधिकारी असणारे ६०हून अधिक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. या वेळी समाजविकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे यांनी या योजनेची सविस्तर माहिती उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना दिली. देशात तसेच महाराष्ट्रात सर्व धर्मांची मोठी तीर्थस्थळे आहेत. अशा ठिकाणी एकदा तरी जाण्याचे बहुतांश ज्येष्ठ नागरिकांचे स्वप्न असते, मात्र गोरगरीब, सर्वसामान्य कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे अथवा सोबत कोणी नसल्याने आणि पुरेशी माहिती नसल्याने तीर्थयात्रा करण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. ही बाब विचारात घेऊन ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या राज्यातील सर्व धर्मातील ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्र राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची व दर्शनाची संधी देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

# ज्येष्ठ पत्रकार रमेश झवर यांना आचार्य अत्रे पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे देण्यात येणाऱ्या आचार्य अत्रे पुरस्कारासाठी यंदा निवड समितीने एकमताने ज्येष्ठ पत्रकार रमेश झवर यांची निवड केली आहे.



प्रत्यक्ष आचार्य अत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली दैनिक मराठा मध्ये काम केलेले झवर हे ५० वर्षांहून अधिक काळ पत्रकारितेत सक्रिय आहेत. दैनिक मराठा ते दैनिक लोकसत्ता असा त्यांचा प्रवास आहे. या कालावधीत उपसंपादक, वार्ताहर, मुख्य उपसंपादक, वृत्तसंपादक, सहसंपादक अशा पदांवर त्यांनी काम केले आहे. दैनिक लोकसत्तामध्ये व्यापार उद्योग पुरवणी (कॉमर्स विभाग) व प्रादेशिक विभाग हेही त्यांनी समर्थपणे सांभाळले होते. संपादकीय पानावरील लेख, स्फुट तसेच लोकसत्ताचे अनेक अग्रलेखही त्यांनी लिहिले आहेत. निवडणुका, साहित्य संमेलने, देश विदेशातील महत्वाच्या घडामोडींचे त्यांनी वृत्तांकन केले आहे.

वयाची ८० वर्षे पार केलेल्या झवर यांचे आजही समाजमाध्यमांवर माहितीपूर्ण लिखाण चालू आहे. त्यांचा ब्लॉग लोकप्रिय झाल्यावर rameshzawar.co.in ही स्वत:ची वेबसाईट त्यांनी सुरू केली. मुंबई मराठी पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष म्हणूनही अनेक वर्षे ते कार्यरत होते. त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


## दुखवटा

### अन्वर बुराण



**अलिबाग** : झुंझार युवक मंडळ पोयनाडचे अध्यक्ष अन्वर इस्माईल बुराण यांचे गुरुवारी (दि.८) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. ते ६९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, दोन मुले, दोन मुली, एक भाऊ, दोन बहिणी असा मोठा परिवार आहे. झुंझार युवक मंडळ पोयनाड संघांसाठी त्यांनी १९७० ते ८०च्या दशकात कबड्डी खेळाडू म्हणून जिल्हास्तरीय स्पर्धा खेळले आहेत. एक उत्कृष्ट कबड्डीपटू म्हणून त्यांची ओळख संपूर्ण रायगड जिल्ह्यात होती. पुढे त्यांनी झुंझार युवक मंडळ पोयनाडचे अध्यक्ष पदाची जबाबदारी गेली ३० वर्षे यशस्वीरित्या पार पाडली.

### मधुकर जाधव



**धाटाव** : रोहा अंधारआळी येथील मधुकर हरी जाधव यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते वय ७६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, सुना, जावई नातवंडे असा परिवार असून त्यांची दशक्रियाविधी सोमवारी (दि.१२) वैकुंठधाम स्मशानभूमी रोहा येथे तर तेरावे धार्मिककार्य गुरुवारी (दि.१५) निवासस्थानी होणार आहेत.

पान १ वरुन

## नवी मुंबई विमानतळाचे काम लवकर पूर्ण करून 'दिबां'चे नाव द्यावे -खासदार बारणे

प्रवशांना सोयी-सुविधा दिल्या पाहिजेत. विमानतळावरील कर्मचा-यांना सौम्य बोलणे, यात्री सेवेसंबंधी प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे, अशी सूचनाही त्यांनी केली.

पुणे विमानतळ हे संरक्षण विभागाचा सर्वाधिक वावर असलेले विमानतळ आहे. अनेक विमानांचे उड्डाण तेथून होते. त्यामुळे अनेकदा अडचणी येतात. त्यामुळे पुण्यात नवीन विमानतळ निर्माण करण्याबाबत पाऊले उचलावीत. देशात केंद्र आणि राज्य सरकार विमानतळाची निर्मिती करतात. मुंबईतही विमानतळावर मोठे गर्दी होत आहे. त्यासाठी एअरलाईन्सकडून प्रवाशांना दोन - तीन तास अगोदर विमानतळावर बोलविले जाते. या पार्श्वभूमीवर आपल्या मतदारसंघातील पनवेलमधील विमानतळ लवकरात-लवकर सुरू करावे, अशी मागणी बारणे यांनी केली.

मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेलमध्ये नवी मुंबई विमानतळ बनत आहे. या विमानतळावरून २०२५मध्ये विमानांचे उड्डाण होईल. विमानतळासाठी जमिनी अधिग्रहण करताना लोकनेते दि.बा.पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठे आंदोलन झाले होते. आंदोलनादरम्यान तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला होता. स्थानिक नागरिकांची विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी केली आहे. याबाबतचा ठराव राज्य सरकारने पाठविला आहे. त्यालाही केंद्र शासनाने मान्यता द्यावी, या मागणीचा बारणे यांनी पुनरुच्चार केला.

## नवीन पनवेलमध्ये एआय एक्सपेरिमेंटल लॅब सुरू

काळानुसार विविध कोर्सेस या संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आले. संस्थेला २५ वर्षे होत असताना विद्यमान पिढीची शैक्षणिक दृष्ट्या आवश्यकता लक्षात घेता आधुनिक तंत्रज्ञान असलेल्या 'एआय एक्सपेरिमेंटल लॅब' उभारण्यात आली आहे.

या कार्यक्रमास एमकेसीएलच्या संचालक विना कामथ, वरिष्ठ व्यवस्थापक अतुल पतौडी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारिणी सदस्य संजय भगत, कामोठे भाजपचे अध्यक्ष रवी जोशी यांच्यासह विविध सेंटरचे प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांचे शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजीचे प्रमुख जयंत भगत यांनी सर्वांचे स्वागत व आभार व्यक्त केले.

# पनवेलमध्ये घुमला भारतमातेचा गजर!

## घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत महापालिकेच्या वतीने तिरंगा यात्रा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.१०)पनवेल महापालिकेच्या वतीने घरोघरी तिरंगा या उपक्रमांतर्गत महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थी, विविध संस्था व नागरिक यांच्या सहकाऱ्याने तिरंगा सन्मानार्थ ढोल-ताशांच्या गजरात हातामध्ये तिरंगा घेऊन, भारत माता की जय, वंदे मातरमच्या घोषणा देत छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा ते वडाळे तलावपर्यंत तिरंगा यात्रा काढण्यात आली.





भारतीय स्वातंत्र्यदिनाचा ७७वा वर्धापन दिनानिमित्त शासन निर्देशानुसार ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये महापालिका कार्यक्षेत्रात घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये नागरिकांमध्ये देशप्रेमाची भावना जागृत व्हावी या हेतूने उपायुक्त बाबासाहेब राजळे यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या वेळी मनपा शाळेतील शिक्षक, अधीक्षक कीर्ती महाजन, भंडारी प्रितेश चौधरी व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. याबरोबरच रविवारी (दि.११) तिरंगा मॅराथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ वाजता महापालिकेच्या मुख्यालयापासून सुरू होणाऱ्या या मॅरेथॉनमध्ये शाळेतील विद्यार्थी, विविध संस्था, तरुण मंडळे, नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

घरोघरी तिरंगा कार्यक्रमांतर्गत १२ ते १४ ऑगस्ट रोजी बचतगटामार्फत तिरंगा मेलाचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये तिरंगा झेंडे, तिरंगा बिल्ले, तिरंगी कपडे इत्यादींचे तिरंगा संदर्भातील विविध स्टॉल उभारण्यात येणार आहेत. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी १३ ते १५ ऑगस्ट असे तीन दिवस घरोघरी तिरंगा फडकवावा. त्यासोबतचे स्वत:चे सेल्फी काढून www.harghartiranga.com या संकेतस्थळावर अपलोड करावे असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

# सिंधुदूर्ग रहिवासी हितवर्धक संघातर्फे वृक्षारोपण

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : वार्ताहर**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सिंधुदूर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघातर्फे वृक्षारोपण कार्यक्रम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि.१०) झाला.

वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ व इतर कोणते शुभेच्छा वस्तू न स्विकारता वृक्षारोपण करा, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आवाहन करून समाजात एक उत्तम पायंडा पाडला आहे. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देऊन सिंधुदूर्ग रहिवासी हितवर्धक संघातर्फे त्यांच्या ५०व्या वाढदिवसानिमित्त ५० वृक्ष पनवेल स्टेशनजवळील ट्रॅफिक लँडमध्ये लावली व त्याची जोपासना मंडळ करणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिंधुदूर्ग भवन उभारणीकरिता जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगून त्यांनी आत्तापर्यंत मंडळाने केलेल्या कामाचे कौतुक केले. तुम्ही असेच उपक्रम करत रहा मी माझ्याकडून शक्य ती सर्व मदत करेन असे म्हटले.

मंडळातर्फे कांचन, बहावा, सोनचाफा, कन्हेरे, बकुळ अशा भारतीय फुलझाडांचे रोपण केले. मंडळाचे अध्यक्ष केशव राणे, उपाध्यक्ष संतोष चव्हाण, सचिव रामचंद्र मोचेमाडकर, सहसचिव वासुदेव सावंत, प्रदीप रावले, बाबाजी नेरुरकर, ज्येष्ठ लेखक दिलीप रेडकर यांनी उपक्रमात विशेष मेहनत घेतली.



# मार्केट यार्ड विद्यालयात वह्या वाटप कार्यक्रम

## श्री. रामशेठ ठाकूर विकास मंडळाचा उपक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर विकास मंडळ यांच्यातर्फे न्यू इंग्लिश स्कूल मार्केट यार्ड येथे इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाकरिता मंडळाचे उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख अध्यक्ष म्हणून लाभले होते.

सर्वप्रथम विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागप्रमुख एम. एम. पाटील यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले आणि दीपप्रज्वलन करण्यास सांगितले. यानंतर विद्यार्थिनींनी रयतगीत व स्वागतगीत सादर केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक जे.एच.चिखलेकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष वाय.टी. देशमुख यांचे स्वागत केले.

रयत शिक्षण संस्था साताराचे लाईफ वर्कर व विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक एम. आर.पाटील यांनी, कार्यक्रमाची रूपरेषा व कार्यक्रमाचे अध्यक्ष वाय.टी. देशमुख यांचा परिचय करून दिला.

विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते वह्यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर वाय. टी. देशमुख यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले व विद्यार्थ्यांना कठीण परिस्थितीवर मात करून शिकण्यास प्रेरित केले. उपशिक्षिका गावंड मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले.

# धामणी येथे वह्या व खाऊ वाटप

**पनवेल** : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राजिप शाळा धामणी व धामणी आदिवासीवाडी येथील विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल व खाऊवाटप करण्यात आले.

या वेळी खालापूर युवा मोर्चा सरचिटणीस विशाल लोते, भाजप सावरोली पंचायत समिती विभाग अध्यक्ष ज्ञानेश्वर पारंगे, युवा मोर्चा सावरोली पंचायत समिती विभाग अध्यक्ष मिलिंद चोगले, धामणी बुथ अध्यक्ष प्रदीप पिंगळे, योगेश महाडिक, निखिल करंजकर, मनोज पिंगळे, मच्छिंद्र लोते, सुहास गायकर, यशवंत मुंडे, नितीन पारंगे, स्वयंम खरपुडे, समीर लोते, खालापूर शिक्षक समितीचे श्रीधर ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य आशा वाघमारे, मनाली लोते, सायली लोते, अंगणवाडीसेविका वनीता लोते, वर्षा करंजकर, श्वेता महाडिक, गीता हीलम, चंद्रकांत वाघमारे उपस्थित होते.



# रिक्षा आणि टॅक्सी चालक मालक संघटनांचे नामफलकांचे अनावरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप पुरस्कृत जनरल कामगार संघटनेच्या रिक्षा आणि टॅक्सी चालक मालक संघटनांचे नामफलक उरण नाका आणि पनवेल एसटी स्टॉण्ड येथे उभारण्यात आले आहे. या नामफलकांचे अनावरण भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील आणि शहराध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि.१०) झाले. हा कार्यक्रम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आला.



उरण नाक्याजवळ जय भारतीय वंदे मातरम संघटनेच्या जय मल्हार मिनिडोअर चालक मालक संघटनेचे नामफलक उभारण्यात आले आहे. या फलकाचे शहराध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते तर पनवेल एसटी स्टॅण्डजवळ संघटनेचे स्थानिक प्रकल्पग्रस्त सहा आसनी टॅक्सी चालक मालक संघटना आणि पनवेल, माणगाव व महाड टॅक्सी ओनर्स असोसिएशनच्या नामफलकाचे अनावरण जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या वळी माजी नगसेविका दर्शना भोईर, कामगारनेते रवि नाईक, पांडूरंग पाटील, रवींद्र कोरडे, नाका अध्यक्ष जनार्दन बडे, सेक्रेटरी गणेश पाटील, खजिनदार भगवान पाटील, नाका प्रमुख दिनेश पाटील, सदस्य राकेश बहिरा, जय मल्हार संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर म्हात्रे, उपाध्यक्ष गणेश पाटील, खजिनदार सुहास घरत, सेक्रेटरी जयवंत शिर्के उपस्थित होते.

# आनंददायी शनिवार अंतर्गत सीडबॉल तयार करणे उपक्रम

**उलवे : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयांमध्ये प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार हा आनंददायी शनिवार म्हणून विविध उपक्रमांनी साजरा केला जातो. शनिवारी (दि.१०)विद्यालयात सीडबॉल तयार करून विद्यार्थ्यांनी साजरा केला.





विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे, वृक्षांचे महत्त्व कळावे, वृक्ष संवर्धनाची गरज लक्षात यावी, त्याचबरोबर रोपांची वाढ कशी होते ही माहिती मिळावी यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, सांस्कृतिक विभाग प्रमुख, गुरुकुल विभाग प्रमुख व 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी सीडबॉल निर्मिती हा उपक्रम विद्यार्थ्यांना दिला होता. सिडबॉल कसे तयार करावे याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली होती. या उपक्रमाच्या प्रमुख पल्लवी पवार यांनी विद्यार्थ्यांकडून सीडबॉल्स बनवून घेतले. विद्यार्थ्यांनी विविध वृक्षांच्या बिया, कंपोस्ट खत व मातीचा वापर करून सीडबॉल्स तयार केले.

या सीडबॉल्सपासून रोपांची निर्मिती कशी होते याचे निरीक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी हे सीडबॉल शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्याच्या जागी तसेच शाळेच्या परसबागेत ठेवले.

या वेळी विद्यार्थ्यांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी विद्यालयाच्या उपशिक्षिका विशाखा गावंड, पल्लवी पवार व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर उपस्थित होत्या.

## भरधाव रिक्षाची दुचाकीला धडक; दोघे जखमी

**पनवेल** : भरधाव रिक्षाचालकाने पुढे जाणाऱ्या दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात पती-पत्नी दोघे जखमी झाल्याची घटना शहरातील पंचरत्न चौक येथे घडली. रुनेश शेळके (३५ रा.डेरिवली) हे त्यांच्या पत्नीसह दुचाकीवरून पंचरत्न चौक येथून जात असताना भरधाव वेगात आलेल्या पाठीमागून रिक्षाचालकाने त्यांच्या दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात ते दोघे जखमी झाले आहेत. या घटनेनंतर रिक्षाचालक पसार झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# युवा महोत्सवात महात्मा फुले महाविद्यालयाची उत्कृष्ट कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या युवा महोत्सवामध्ये उत्कृष्ट कामगिरी करीत नऊ बक्षिसांची कमाई केली.

कर्जत येथील राहुल धारकर महाविद्यालयामध्ये झालेल्या युवा महोत्सवामध्ये स्नेहल सुनील पाटील हिने शास्त्रीय गायन व नाट्यसंगीत या गायन प्रकारामध्ये प्रथम क्रमांक तसेच सुगम संगीत व स्वरवाद्य या प्रकारांमध्ये अनुक्रमे तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविला तर अमीषा अनिरुद्ध भगत हिने मराठी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. पंकज पंढरीनाथ पांडुळे व अमीषा भगत यांनी हिंदी वादविवाद स्पर्धेत प्रथम क्रमांक व मराठी वादविवाद स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. मानसी श्यामदेव पासी हिने मेहंदीमध्ये द्वितीय क्रमांकाचे बक्षीस प्राप्त केले. स्नेहल पाटील, नाजुका मुकादम, भूमिका महाडीक, कोमल कदम, अरहंत कुशल वर्धन यांनी समूहगान स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी, महाविद्यालयाने मागील शैक्षणिक वर्षातही युवा महोत्सवाच्या झोनल राउंडमध्ये दहा पारितोषिके मिळविली होती व विद्यापीठाच्या अंतिम स्पर्धेतही सात पदके मिळविली होती. या वर्षीही विद्यार्थ्यांनी त्यात सातत्य राखले, या गोष्टीचा मला अभिमान वाटतो. सहभागी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभागाचे चेअरमन प्रा. प्रवीण गायकर, प्रा. डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, प्रा. डॉ. लीन मेश्राम, डॉ. कीर्ती म्हात्रे आदींनी मार्गदर्शन केले.



# गव्हाण विद्यालयात अकरावी विद्यार्थी प्रवेशोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये प्रवेशित इयत्ता अकरावी वर्गातील विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव समारंभ रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्रीछत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये उत्साहात झाला.





## चेअरमन अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेजचे ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र चौधरी यांचेसह माणिकराव घरत, जयवंती ठाकूर, राजू खेडकर, अर्चना पाटील तसेच माध्यमिक विभागाचे ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व मिठाई देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी, विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत जिद्दीने अभ्यास करून आपली गुणवत्ता वाढवावी व विद्यालयाच्या शिस्तीचे पालन करावे. उत्तम ज्ञान व आचरणाने या देशाचे सुजाण नागरिक बनावे, असे आवाहन केले. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी यांनी, विद्यार्थ्यांनी शिस्तप्रिय वर्तनातून उज्ज्वल यश संपादन करावे, असे आवाहन केले. शिक्षक प्रतिनिधी म्हणून कॉलेजचे मराठी भाषा विभागप्रमुख राजेंद्र चौधरी यांनीही आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी प्रवेशोत्सव सोहळ्याचा हेतू सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता बारावीची विद्यार्थिनी निकिता किशोर कांबळे हिने तर आभार प्रदर्शन यू.डी.पाटील यांनी केले.

# लायन्स पनवेल सरगमतर्फे आरोग्य शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे नुकतेच करंजाडे येथील दुधे विटेवरी गृहसंकुल येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये मधुमेह, रक्तदाब, नेत्र तपासणी, इसीजी, विविध प्रकारच्या रक्त तपासण्या अपोलो हॉस्पिटलच्या माध्यमातून करण्यात आल्या.

या शिबिराचे उद्घाटन डिस्ट्रिक्ट डमिनिस्ट्रेटर अनूप थरवानी यांचे हस्ते करण्यात आले. या शिबिराला सोसायटी मधील रहिवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे शिबिर यशस्वी होण्यासाठी सरगम क्लबच्या अध्यक्ष मानदा पंडित, प्रेमेंद्र बहिरा, धवल शहा, अलकेश शहा, संजय गोडसे, स्वाती गोडसे, जयेश मणियार, प्रदीप भट्टाचार्य, आदित्य दोशी, ओमकार खेडकर, महेंद्र लोहार, अनिल परमार तसेच दुधे विटेवरी संकुलाचे चेअरमन भैरुलाल जाट आणि पदाधिकारी प्रफुल्ल चौधरी, कुसई, प्रशांत वडके, प्रवीण परमार, निखिल वडेर, सुभाष शिर्के यांनी खूप परिश्रम घेतले.

# 'अबोध'ची ४० वर्षे

## म्हणे, माधुरीच्या कारकिर्दीला चाळीस वर्ष झाली...खरं वाटत नाही हो

शबाना आझमी, स्मिता पाटील, दीप्ती नवल यांनी ऐंशीच्या दशकाच्या पूर्वार्धात समांतर (अथवा नवप्रवाहातील) चित्रपट व पारंपरिक लोकप्रिय मनोरंजक चित्रपट या दोन्हीत चांगलाच समतोल राखला होता.

सरगमच्या यशाने जयाप्रदा व हिम्मतवालाच्या यशाने श्रीदेवीची हिंदीतील वाटचाल सुकर झाली होती. डिंपल खन्नाने सागर स्वीकारत पुनरागमन करताच तिला जख्मी शेर, अर्जुन इत्यादी चित्रपट मिळाले होते. या दिवसात हे चित्रपट निर्मितीवस्थेत होते. पद्ममिनी कोल्हापूरे, पूनम धिल्लॉन, रति अग्निहोत्री, टीना मुनिम, मीनाक्षी शेषाद्री, अनिता राज यांची आपापल्या पध्दतीने वाटचाल सुरू होती. रेखा टिच्चून टिकून होतीच.


अशातच एके दिवशी राजश्री प्रॉडक्सन्सच्या प्रथेनुसार एक आमंत्रण हाती आले, हीरेन नाग दिग्दर्शित अबोध प्रदर्शनास सज्ज झाला असून मरीन ड्राईव्ह येथील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये दुपारी चार वाजता या चित्रपटातील नवीन कलाकार माधुरी दीक्षित व तापस पॉल आणि या चित्रपटाच्या युनिटची सिनेपत्रकारांशी भेट घडवण्यात येणार आहे.

माधुरी दीक्षित हे नाव मी त्यावेळेस पहिल्यांदाच वाचले आणि आणखीन एक नवतारका चित्रपटसृष्टीत पाऊल टाकतेय असे वाटले. मीही मिडियात तसा नवीनच होतो आणि अशा वेळेस फारसा उशीर करू नये अशा समजूतीत होतो. चित्रपटसृष्टीत वावरताना वाढताना त्यात बदल होत होत गेला तो भाग वेगळा. राजश्री प्रॉडक्सन्सचा चित्रपट ही गोष्ट मला नवीन नव्हती. ऑपेरा हाऊस थिएटरला कुटुंबासह पाहिलेला उपहार (१९७२) हा राजश्री प्रॉडक्सन्सचा मी पाहिलेला पहिला चित्रपट. त्यानंतर सौदागर, गीत गाता चल, दुल्हन वही जो पिया मन भाये, अखियोंके झरोखो से असे राजश्री प्रॉडक्सन्सचे चित्रपट पाहत पाहत मोठा झालो. त्यांच्या चित्रपटांची हिंदीतील भली मोठी तपशीलवार श्रेयनामावली, सहकुटुंब पहावेत असे स्वच्छ मनोरंजक चित्रपट, आदर्श कथानक अशा गोष्टींचा मनावर असलेला पगडा कायम ठेवतच महेश भट्ट दिग्दर्शित सारांश (मुंबईत रिलीज २५ मे १९८४) च्या अशाच पत्रकार परिषदेला गेलो आणि मी एकूणच नवखा असल्यानेच बुजल्यासारखा वागलो. (गिरगावातील चाळीत मध्यमवर्गीय संस्कारात वाढल्याने असेल कदाचित) आणि आता अबोधच्या दुपारी चार वाजताच्या पत्रकार परिषदेस वेळेवर पोहचलो होतो.

...पाच वाजले, साडेपाच वाजले तरी माधुरी दीक्षित पोहचली नाही. राजश्री प्रॉडक्सन्सचा लौकिक पाहता हे अनपेक्षित होते. उगाच आमची आपली कुजबुज सुरू झाली, पहिल्याच चित्रपटाच्या वेळेस ही उशीरा येतेय, स्वतःला काय स्टार समजते काय? वगैरे वगैरे. सिनेपत्रकारीतेत गॉसिप्स पहिल्या क्रमांकावर असते, चित्रपट कसा आहे वगैरे नंतर येते हा जणू धडाच मला मिळत होता...

अशातच माधुरी दीक्षित आली. अगदीच महाविद्यालयीन युवती हो. सोबत आई बाबा होते. त्या काळातील अनेक अभिनेत्री असा आईचा हात धरूनच चित्रपटसृष्टीत येत. माधुरीने आल्या आल्या सर्वांची माफी मागत म्हटलं ( संस्कार म्हणतात ते हेच), अंधेरीतील जे. बी. नगरवरून आम्ही वेळेवर निघालो, पण ट्रॅफिकमध्ये फार अडकलो... पहिलाच चित्रपट असला तरी माधुरीच्या वागण्यात/ बोलण्यात/ पाहण्यात/ ऐकण्यात कसलेही अवघडलेपण नव्हतेच. ती आम्हा जवळपास सर्वच सिनेपत्रकाराना छान हसत भेटली. (तेव्हापासूनचे तिचे ते हास्य आजही कायम आहे). मोबाईल येण्याच्या खूपच अगोदरचा हा काळ.

मला आठवतय, शुक्रवारच्या नवशक्तीतील सदरात या चित्रपटाची सर्वसाधारण ओळख मी करून दिली. माधुरी दीक्षितला मी दिलेले हे पहिले कव्हरेज. निमित्त अर्थात अबोध. काही दिवसातच अबोधच्या मुंबईतील प्रदर्शनाची तारीख ठरली, १० ऑगस्ट १९८४. (म्हणजेच चाळीस वर्ष झालीदेखिल हो). त्या काळात चित्रपटाच्या प्रिन्ट असत आणि टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत. शहरातून ग्रामीण भागात चित्रपट पोहचायला काही महिने (कधी एक दीड वर्ष) लागत. राजश्री प्रॉडक्सन्सचे देशभरात चित्रपट वितरणाचे जाळे होते... (चित्रपट संस्कृतीचा अभ्यास करताना ही गोष्टही महत्त्वाची.. प्रेक्षकांपर्यंत चित्रपट कसा पोहचत आला हे खूपच माहितीपूर्ण व रंजक आहे.)






अबोधचा आम्हा चित्रपट समीक्षकांसाठीचा प्रेस शो रिलीजच्या दोन दिवस अगोदर न्यू एक्सलसियर थिएटरमधील चौथ्या मजल्यावरील मिनी थिएटरमध्ये होता. मला आजही आठवतेय, कोणतीही कसलीही अपेक्षा न ठेवता मी अबोध पाह्यला बसलो. राजश्री प्रॉडक्सन्सचा चित्रपट जसा सरळ रेषेत जाणारा, साधी गोष्ट असणारा हवा तसाच हाही चित्रपट होता. त्याची गोष्ट आता आठवत नाही. तशी ती नव्हतीच.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

आपले स्वाभाविक हास्य, नृत्य साधना आणि शैली तसेच फॅन्स आणि फॉलोअर्सकडून सोशल मिडियात भरपूर लाईक्स मिळवत असलेल्या माधुरी दीक्षितची भूमिका असलेला पहिला हिंदी चित्रपट राजश्री प्रॉडक्सन्सच्या 'अबोध'च्या प्रदर्शनास यशस्वी ४० वर्षे पूर्ण होत आहेत. या चित्रपटाचे निर्माते ताराचंद बडजात्या होते, तर दिग्दर्शन हीरेन नाग यांचे होते. बंगालचा सुपर स्टार तापस पॉल या चित्रपटात माधुरी दीक्षितचा नायक होता. या चित्रपटात अशोक सराफ, शीला डेव्हिड, लीला मिश्रा, दिनेश हिंगू, सुरेन्द्र पुरोहित, सविता प्रभूणे, राजश्री नायर, मोहन चोटी इत्यादींच्याही भूमिका आहेत तर संगीत रवींद्र जैन यांचे आहे.

आज मी जुन्या आठवणीत रमतो, फ्लॅशबॅकमध्ये जातो तेव्हा अबोध चे ते दिवस व तेव्हाची माधुरी दीक्षित हे सगळेच डोळ्यासमोर येते.

आपलं दिलखुलास आकर्षक व्यक्तिमत्व आणि मेहनत या गुणांवर यशस्वी ठरलेली माधुरी दीक्षित हिंदी चित्रपटसृष्टीतील नंबर वनची तारका ठरली तरी मराठी भाषा, संस्कृती, सभ्यता, परंपरा, मूल्ये यांना विसरली नाही हे मी एक सिनेपत्रकार म्हणून अनुभलयं. हिंदी चित्रपटाच्या सेटवर त्या काळात ती मराठी सिनेपत्रकाराना आवर्जून मराठीतच मुलाखत देई. तिने मराठी चित्रपटातून भूमिका साकारावी अशी मराठी सांस्कृतिक, सामाजिक इच्छा होतीच. माधुरी दीक्षितने 'बकेट लिस्ट' (२०१८) या मराठी चित्रपटात भूमिका साकारली. तसेच तिने '१५ ऑगस्ट' (२०१९) या मराठी चित्रपटाची निर्मितीही केली. हा चित्रपट थेट ओटीटी प्लॅटफॉर्मवर अर्थात तिसरा पडदा पध्दतीने रिलीज रिलीज केला, पण माधुरी दीक्षितने या चित्रपटाचा मुंबईत ग्लॅमरस प्रीमियर शो केला. तिनेच पंचक (२०२४ला प्रदर्शित) या मराठी चित्रपटाचा निर्मित केली आणि प्लाझा चित्रपटगृहात तिने आपल्या या चित्रपटाच्याच खेळास थिएटर भेटही दिली. माधुरीला पाहताच हाऊसफुल्ल गर्दीच्या आनंदाला उधाण आले. अनेकांच्या आयुष्यातील हा स्मरणीय क्षण ठरला असेल. आपल्या कारकीर्दीच्या चाळीसाव्या वर्षीही अशी लोकप्रियता टिकवणे सोपे नसते हो. ते माधुरीला तिच्या गुणांनी साध्य झाले...

**माधुरीच्या यशात अनेक गोष्टी...**

तिचं कायमस्वरुपी हास्य. मधुबाला, माधुरी, सोनाली बेन्द्रे, ऐश्वर्य रॉय यांच मधुर हास्य डोळ्यासमोर आणलतं तरी आपण फ्रेश होतो. भरत रंगाचारी दिग्दर्शित टक्कर (१९९३)च्या सेटवर सोनालीशी माझी पहिली भेट झाली. त्यानंतर तिच्या मुलाखतीनिमित्त अनेक भेटी होत होत अलिकडेच सरफरोशच्या पंचवीस वर्ष पूर्णच्या इव्हेन्टसला भेटलो, तेच हास्य.

माधुरीची व्यावसायिकता... निर्माते सुधाकर बोकाडे यांची साजन (१९९१)च्या खणखणीत यशावर मुलाखत घेण्याचा योग आला असता त्यांनी मला सांगितले, त्यांनी निर्मिलेल्या इज्ञतदार, साजन व प्रहार या चित्रपटात माधुरीने भूमिका साकारताना आऊटडोअर्स शूटिंगच्या वेळेस हॉटेलमधील आपल्या कपड्यांच्या लॉन्ड्रीचं बिल स्वतः भरले. तो खर्च कधीच ती निर्मात्याच्या खात्यात टाकत नाही...

माधुरीचे नृत्य...मिडियात असल्यानेच मला तिचं चित्रपटातील नृत्याच्या वेळेस सेटवर शूटिंग रिपोर्टींगचा चक्क तीनदा लाईव्ह अनुभव आला. दिग्दर्शक एन. चंद्रा यांच्या आमंत्रणावरुन मेहबूब स्टुडिओत तेजाब चे एक दोन तीन चार गाणे, दिग्दर्शक पंकज पराशरच्या राजकुमारच्या फिल्मालय स्टुडिओतील सेटवर आणि डेव्हिड धवन दिग्दर्शित यारानाच्या हैदराबादच्या अन्नपूर्णा स्टुडिओत... नृत्यासाठीची माधुरीची अथक मेहनत थक्क करून टाकणारी. अक्षरश: घाम गाळणे म्हणजे काय हे तेव्हा दिसले...

माधुरी दीक्षित या नावाभोवतीचं वलय आणि वळण अनेक गोष्टींतून आकाराला आलेय. त्याच्या गोष्टी सांगाव्यात तेवढ्या थोड्याच.

मी चित्रपट पत्रकार/ विश्लेषक म्हणून माधुरीची अबोध पासूनची वाटचाल पाहतोय. कधी तिची भूमिका असलेल्या चित्रपटांच्या मुहूर्तांना हजर राहिलो (तेजाब, त्रिदेव इत्यादी), तर कधी मुलाखतींचे योग. तर कधी तिची भूमिका असलेल्या चित्रपटांच्या सेटवर शूटिंग रिपोर्टींगचे योग.

पटतं नाही ना, माधुरी दीक्षितच्या कलरफुल, अष्टपैलू धक धक कारकिर्दीला चाळीस वर्ष पूर्ण झाली.....आकड्यात झाली म्हणायचे इतकेच.

# सर्वांत तरूण क्रांतिकारक खुदीराम बोस

खुदीराम बोस भारतातील सर्वात तरूण वयाचा क्रांतीकारक म्हणून ओळखले जातात. वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी ते हुतात्मा झाला. त्यांचा जन्म बंगालमधल्या मेदिनीपूर जिल्ह्यातल्या बहुवेनी या गावात ३ डिसेंबर १८८९ला झाला. त्यांच्या लहानपणीच आई (लक्ष्मीप्रियादेवी) आणि वडील (त्रैलोक्यनाथ) यांचा मृत्यू झाल्याने त्यांची मोठी बहीण अनुरूपादेवी आणि तिचे पती अमृतलाल यांनी त्यांचे पालनपोषण केले.

बंगाल प्रांताचे विभाजन करण्याचे ब्रिटीश सरकारने १९०३ साली निश्चित केले. सर्वसामान्य लोकांमध्ये नाराजीची तीव्र लाट पसरली. खुदीरामलाही बंगालच्या फाळणीचा निर्णय अन्यायकारक वाटला, देशासाठी काहीतरी करावे असे सारखे वाटू लागल्याने मिदनापूर येथे थोडेफार शिक्षण झाल्यावर त्याने सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करला.



सरकारच्या विरूद्ध आंदोलने करणाऱ्यांना पकडून कठोर शिक्षा देण्यात येऊ लागल्या. थोड्याच दिवसांत मुझफ्फरपूरचे मॅजिस्ट्रेट जे क्रांतिकारकांना अमानुष शिक्षा देत, त्यांना मारण्याची जबाबदारी क्रांतिकारकांचे नेते बरींद्रकुमार व उपेंद्रनाथ यांनी खुदीरामवर सोपवली व मदतनीस म्हणून प्रफुल्लचंद्र चक्रवर्ती याला मदतीला दिले. ते दोघेही मुझफ्फरपूरमध्ये आले व मॅजिस्ट्रेट किंग्जफ़ोर्ड याच्यावर लक्ष ठेवून संधीची वाट पाहू लागले.

न्यायाधीश किंग्ज फोर्डला मारूनच सरकारचा विरोध करण्याचे त्यांनी पक्के केले. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या आनंदमठ या कादंबरीतील 'वंदे मातरम्' या गीताने त्यांनी लोकांमध्ये नवसंजीवनी पसरविली.

खुदीरामने किंग्ज फोर्डला मारण्याची जबाबदारी स्वीकारली. त्याचा सहकारी प्रफुल्ल चक्रवर्ती याच्या सहकार्याने ३० एप्रील १९०५ या दिवशी किंग्ज फोर्ड याच्या गाडीवर बॉंब फेकून त्याला मारण्याचे निश्चीत झाले. त्याप्रमाणे एक बॉंब फेकण्यात आला, परंतु तो चुकून दुसऱ्याच एका गाडीवर फेकण्यात आल्याने त्या गाडीतील दोन महिला ठार झाल्या. किंग्ज फोर्ड मात्र बचावला. खुदीराम व त्याचा साथीदार यांनी तत्काळ पळ काढला. खुदीराम रातोरात ४० किमी पळाला व बेनी रेल्वे स्टेशनवर आला. भूक लागल्यामुळे तो एका दुकानात चणेफुटाणे घेत असताना तेथील स्टेशनमास्तर पोंटरला म्हणत होता, 'अरे ही बातमी वाचली का? काल मुझफ्फपुरला दोन मडमांचा खून करून दोघे जण फरारी झाले आहे. त्यांना पकडण्यासाठी वॉरंट सुटले आहे. तेव्हा आता ही गाडी येईल त्यात कोणी सापडते का पहा.' खुदीरामने हे संभाषण ऐकताच, तो एकदम म्हणाला, 'काय, किंग्जफोर्ड मेला नाही.' जवळच्या लोकांना त्याच्या या उद्गाराचे आश्चर्य वाटले व त्यांना शंका आली. त्याबरोबर खुदीरामने तेथून पळ काढला.

घटनेच्या दुसऱ्या दिवशी खुदीराम पकडला गेला, तर प्रफुल्लने अटकेपूर्वीच आत्महत्या केली. खुदीरामजवळ दोन पिस्तुले व ३० काडतुसे सापडली. त्याच्यावर ३०२ कलमाखाली खटला भरुन त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. ११ ऑगस्ट १९०८ रोजी हा तरुण वीर हातामध्ये गीता घेऊन व भारतमाता की जय म्हणत हसत हसत आनंदाने फाशी गेला. सशस्त्र क्रांतीत बॉंबचा उपयोग करणारा खुदीराम पहिला क्रांतीकारक ठरला.

**(साभार : बालसंस्कार)**

# कृषी उत्पादनांच्या भौगोलिक मानांकनात महाराष्ट्र अग्रेसर

भौगोलिक चिन्हांकन ही एक प्रकारची मानांकन नोंद आहे, जी भौगोलिक क्षेत्राशी निगडीत आहे. नैसर्गिकरीत्या व मानवी प्रयत्नातून उत्पादीत होणाऱ्या कृषी मालाची ओळख, त्याद्वारे त्याच्या खास गुणवत्तेतील सातत्य व त्यांच्यामधील विशेष गुणधर्माचे जतन करण्यासाठी भौगोलिक चिन्हांकन उपयुक्त आहे. भारतामध्ये एकूण २०० कृषी उत्पादनांना भौगोलिक मानांकन प्राप्त झाले असून त्यापैकी महाराष्ट्रामध्ये ३८ कृषी उत्पादकांना भौंगोलिक चिन्हांकन प्राप्त आहे. कृषी उत्पादनांच्या भौगोलिक मानांकनात महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे.

राज्यात एकूण ३८ कृषी व फलोत्पादन पिके/उत्पादनांना भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. भौगोलिक मानांकन प्राप्त पिकाच्या कार्यक्षेत्रातील संबंधित पिकाच्या उत्पादकांची भौगोलिक संकेत (नोंदणी व संरक्षण) अधिनियम १९९९ अंतर्गत अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी केल्यास भोगोलिक चिन्हांकनाचा लोगो लावून उत्पादनाची विक्री करता येते. पिकाच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्माची ओळख निर्माण करून विक्री केल्यास उत्पादकास अधिकची किंमत मिळते. राज्याला लाभलेले वैशिष्ट्यपूर्ण वातावरण व नैसर्गिक जैवविविधतेमुळे नवीन कृषी उत्पादनांना भौगोलिक मानांकन प्राप्त करण्यास प्रचंड वाव आहे. देशातील नवीन पिकास भौगोलिक मानांकन अदा करण्याची कार्यवाही चेन्नई येथील भौगोलिक मानांकन रजिस्ट्री येथून करण्यात येते.



राज्यात भौगोलिक मानांकन प्राप्त पिकाचे अधिकृत वापरकर्ता नोंदणीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येते. सन २०१९-२० अखेर १२३२ उत्पादकांची अधिकृत वापरकर्ता नोंदणी झाली होती. संचालक फलोत्पादन विभागामार्फत उत्पादकांची अधिकृत वापरकर्ता नोंदणीसाठी विशेष प्रयत्न करण्यात आल्याने सन २०२४अखेर ११४२३ उत्पादकांची अधिकृत वापरकर्ता नोंदणी झाली आहे. कृषी उत्पादनाच्या देशात एकूण झालेल्या उत्पादकांची अधिकृत वापरकर्ता नोंदणीमध्ये महाराष्ट्राचा ६१ टक्के वाटा आहे तसेच ५००० प्रस्तावांनादेखील लवकरच मान्यता मिळून अधिकृत वापरकर्ता नोंदणीत मोठी वाढ होणार आहे.

अधिकृत वापरकर्ता नोंदणीने भौगोलिक क्षेत्राशी निगडित मालास कायदेशीर संरक्षण प्राप्त होते. भौगोलिक चिन्हांकन मालास निर्यातीसाठी अधिक संधी उपलब्ध होतात अशा नोंदणी करत कृषी मालास राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर ब्रँडींग होण्यास मदत होते. व्यापारी चिन्हाला बाजारपेठेत जे महत्त्व असते तेच महत्त्व कृषीमालाच्या भौगोलिक चिन्हांकनासह असते. त्यामुळे असे नोंदणी केलेल्या उत्पादनाच्या उत्पादकाला जास्तीचे आर्थिक उत्पन्न मिळून त्याच्या उन्नतीस हातभार लागतो. भौगोलिक मानांकन प्राप्तीमुळे भारतीय कृषी निर्यातीस जागतिक बाजारपेठेत निश्चितच लाभकारक ठरणार आहे.

**-दत्तात्रय कोकरे**

# श्रावणात आरोग्यवर्धक, गुणकारी रानभाज्यांची रेलचेल

श्रावण महिन्यास सुरुवात झालेली असून या महिन्यात अनेक सणवार असतात. शिवाय पुष्कळ जण या महिन्यात मांसाहार करत नाहीत. रानावनात व रानमाळावर विविध रानभाज्या याच श्रावणात फुलतात. या विशेष हंगामात मिळणाऱ्या आरोग्यवर्धक रानभाज्यांचे सेवन केल्याने आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते. केवळ श्रावणात फुलणाऱ्या या वनस्पतींचे गुणधर्म औषधी असल्याने त्या आवर्जून खाल्ल्या जातात.

**कपाळफोडी** : याच्या पानांची भाजी करतात. जीर्ण आमवातामध्ये पानांची भाजी खाण्याची प्रथा आहे. ही भाजी आमवात या संधिवाताच्या प्रकारात गुणकारी आहे. पोट गच्च होणे, मलाविरोधसारख्या विकारात कपाळफोडीच्या भाजीने आराम मिळतो. स्त्रियांची मासिक पाळी नियमित होत नसेल, तर या भाजीचा चांगला उपयोग होतो. आधुनिक शास्त्रानुसार कपाळफोडीच्या पानात अँटिबायोटिक व अँटिपॅरासायटिक तत्त्वे असल्याने जुनाट खोकल्यावर कपाळफोडीची भाजी उपयुक्त आहे. **भारंग** : ही भाजी जिल्ह्यात मुबलक मिळत आहे. ती उगवल्यानंतर कोवळी असताना तोडली जाते. भारंगाची सुकी भाजी विशेष लोकप्रिय आहे. काहीजण वाल टाकून ही भाजी करतात. **कंटोली** : ही कंटोली किंवा करटोली भाजी कारल्यासारखी दिसते. कारल्याची भाजी करतात तशीच या फळाची भाजी केली जाते. जिल्ह्यातील सर्व बाजारात आदिवासी महिला ही भाजी विक्रीसाठी घेऊन येत आहेत, मात्र भाव वधारले असून एक वाटा ५० रुपयांना आहे. कंटोलीला जून ते ऑगस्ट महिन्यात फुले व त्यानंतर फळे येतात. कंटोली हे



डोकेदुखीवर उत्तम औषध आहे तसेच मधुमेहाच्या रुग्णांनी या भाजीचे नियमित सेवन केल्यास रक्तातील साखर कमी होते.

**कुरडूची भाजी** : कुरडूची कोवळी पाने शिजवून त्याची भाजी करतात. दमेकरी, जुनाट खोकला, वृद्ध माणसांचा कफ विकार यात ही भाजी उपयुक्त आहे. कुरडूची पालेभाजी लघवी साफसुद्धा करायला उपयोगी आहे. या पालेभाजीमुळे कफ कमी होतो. जुनाट विकारात कुरडूच्या पालेभाजीचा रसदेखील पितात. कुरडूच्या बिया मूतखडा विकारात उपयुक्त आहेत. **कुलुची भाजी** : फोडशी किंवा कुलु किंवा काल्ला या नावाने ही रानभाजी ओळखली जाते. ही भाजी म्हणजे एक प्रकारचे गवतच असते. ती फक्त पावसाळ्यातच मिळते. इतर पावसाळी भाज्यांप्रमाणे ही चविष्ट असते तसेच शाकाहारी व मांसाहारी या दोन्ही प्रकारात करता येते. **काटेमाठ** : काटेमाठच्या कोवळ्या भाज्या आणि कोवळ्या फांद्या भाजीसाठी वापरतात. पावसाळ्यात ओसाड जमिनीवर, रस्त्याच्या कडेला आणि शेतात काटेमाठ ही वनस्पती आढळते. **चुका** : चुक्याच्या पानांची, कोवळ्या फांद्यांची आणि खोडांची भाजी केली जाते. ओसाड जमिनीवर, बागेत आणि शेतात या वनस्पतीची वाढ होते. चुका ही भाजी अतिशय रुचकर असते. त्यामुळे या भाजीला रोचनी नावानेसुद्धा ओळखले जाते. चुकाची भाजी आंबट-गोड असते.

रानभाज्या प्रकारांमध्ये अंबाडा, खरशिंग, दिंडा, लोथ, पेटा, भारंगी, अळू, तेरुली, फांगली, टाकळा, अग्निशिखा, रानतुळस, बांबू कोंब, रताळ्याचे कोंब, कवदर, कैला, टरली, कसविंदा, कुड्याच्या शेंगा अक्रोड अशा विविध प्रकारच्या रानभाज्यांचा समावेश होतो.

रानभाज्यांचे आहारातील महत्त्व खूप आहे. शासन कृषी विभागाने त्यांच्या विक्रीस प्रोत्साहन द्यावे. रानभाज्यांना हमीभाव द्यावा. जास्ती जास्त रानभाज्या महोत्सव भरविण्यात यावा. यामध्ये आदिवासी व महिला गटांना सहभागी करून घ्यावे, असे सुधागडातील प्रकाश पालकर यांनी सांगितले.

## निवडक

### मतिमंद मुलांना शैक्षणिक मदत



**चौक** : आधार चॅरिटेबल ट्रस्ट चौक व देशमुख मराठा समाज खालापूर मंडळाचे अध्यक्ष हभप प्रभाकर देशमुख यांच्या वतीने अवनी मतिमंद निवासी विद्यालय माळ-शिरोशी येथे विविध प्रकारची मदत करण्यात आली. प्रत्येक मुलाला गणवेश वाटप करण्यात आला. शैक्षणिक साहित्याबरोबर गरजेच्या वस्तू देण्यात आल्या. मुसळधार पावसाने शाळेची मोठी हानी झाली आहे, तिच्या दुरूस्तीचा खर्च देण्यात आला. मतिमंद मुलांना सकाळी नाश्ता, दुपारी जेवण दिल्यावर रात्री मिष्ठान्न जेवण देऊन मतिमंद मुलांच्या सोबत जेवण करण्यात आले. कार्यक्रमास व्यवस्थापक ऋषीकेश शेट्टी व सौ. शेट्टी, प्रशांत वाघमारे, प्रमोद देशमुख उपस्थित होते.

### कोमसापतर्फे मान्यवरांचा सत्कार



**नागोठणे** : कोमसाप रायगड जिल्हा कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीत प्रा. एल. बी. पाटील, सुधीर शेठ, रमेश धनावडे यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य रायगड भूषण प्रा. एल. बी. पाटील यांना शहीद भगतसिंग गौरव जिल्हास्तरीय महोत्सवात साहित्य क्षेत्रात लक्षणीय कार्य केल्याबद्दल साहित्यरत्न पुरस्कार शिव व्याख्याते प्रशांत देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले होते. साहित्यिक रमेश धनावडे यांना मराठी साहित्य मंडळाचा सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे.

### सर एस. ए. हायस्कूलतर्फे पथसंचलन

**मुरूड** : स्वातंत्र्य प्राप्तीसाठी केलेल्या त्यागाच्या, शौर्याच्या इतिहासाला उजाळा देण्यासाठी प्रतिवर्षाप्रमाणे येथील सर एस.ए. हायस्कूल व कै.म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयातर्फे शहरातील प्रमुख मार्गावरून पथसंचलन करण्यात आले. शहरातील गणेश आळी नाक्यावर असलेल्या क्रांती स्तंभाला मान्यवरांनी पुष्पमाला अर्पण करून आदरांजली वाहिली. यामध्ये तहसीलदार रोहन शिंदे, जं. वि. मंडळाचे संचालक ज्येष्ठ संचालक प्रमोद भायदे, पांडुरंग आरेकर, गटविकास अधिकारी राजकुमार खताळ, मुख्याध्यापक सरोज राणे, मंडळ अधिकारी खुशाल राठोड, तलाठी रुपेश रेवसकर, नगर परिषदेचे अधीक्षक परेश कुंभार, पर्यवेक्षक भास्कर मोरे, नायब तहसीलदार संजय तवर, शेखर खोत, कर निरीक्षक नंदकुमार आंबेटकर, महसूल मुख्य लिपिक विजय महापुस्कर यांच्यासह विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाबाबत प्रतिज्ञा घेतली.



# कत्तलीसाठी गुरे नेणाऱ्यांचा प्रयत्न फसला





ड्रायव्हरला अटक; १३ जणांविरूद्ध गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर-महाबळेश्वर मार्गावर कापडे गावाच्या हद्दीत विनापरवाना गुरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच गोतस्करांचा प्रयत्न गोरक्षकांच्या सतर्कतेमुळे फसला आहे. शुक्रवारी (दि.९) रात्री ११.१५वा.च्या सुमारास गोरक्षकांनी तस्करांचे वाहन अडविले आणि नाकाबंदी केली. यामुळे पोलादपूर पोलिसांनी आरोपी ड्रायव्हरला अटक केल्याची माहिती पोलादपूर पोलीस ठाण्यातून देण्यात आली.

पोलादपूर कापडे फाट्यावर शुक्रवारी रात्री येथील गोरक्षकांनी प्रशासनाच्या सहाय्याने आणि स्थानिकांच्या मदतीने मोठी कारवाई केली. वाढती गोवंश कत्तल रोखण्यासाठी गोरक्षक नेहमीच मेहनत घेत असल्याचे यामुळे स्पष्ट झाले आहे. शुक्रवारी रात्री आरोपी जावेद वालवटकर (वय ५२, रा. मुरूड) हा महिंद्रा बोलेरो पिकअप (एमएच ०८ ओपी ५३५२)मध्ये सहा गाई घेऊन कत्तलीच्या उद्देशाने घेऊन जात असल्याची माहिती गोरक्षकांना समजल्यानंतर रात्री गोरक्षकांनी सापळा रचून तस्करांचा कत्तलीचा प्रयत्न हाणून पाडला.

या वेळी बोलेरो गाडी पकडून कत्तलीसाठी नेत असलेल्या सहा गाईंना जीवदान देण्यात तसेच ड्रायव्हर जावेद वालवटकर याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात गोरक्षकांना यश आले. याप्रकरणी १३ आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून ड्रायव्हर जावेद वालवटकर याच्यासह मंगेश खेडेकर, सज्जाद, रियाज कचकोल, आसिम कुदेकर, फाईक मदगडी, नासीर हकीम, रफिक उलडे, मोतशीम, नईफ बाबर, शाहिद खान, इरफान, अन्वर सय्यद अशी आरोपींची नावे असून पोलादपूर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माने, पोलीस ठाणे अंमलदार पोलीस हवालदार कोंडाळकर हे अधिक तपास करीत आहेत.

## खोपोलीतील छत्रपती शाहू महाराज नाट्यगृहाची दूरवस्था



**शहराचे वैभव असलेल्या वास्तूची डोळ्यादेखत दूरवस्था होत असल्याने मनस्वी दुःख होत आहे. आवश्यक दुरुस्ती व डागडुजीसाठी निधी मंजूर असल्याचे समजते.**

**-गुरुनाथ साठेलकर,** सामाजिक कार्यकर्ते खोपोली

**दुरुस्ती व डागडुजीबाबतीत सविस्तर अहवाल सादर करण्यात आला आहे. यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. प्रशासकीय मंजुरीसाठी सविस्तर प्रस्तावही तयार करण्याचे काम पूर्णत्वास आले आहे. पावसाचा जोर कमी झाल्यावर डागडुजीच्या कामाला सुरुवात होईल.**

**-डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी खोपोली**

**खोपोली : प्रतिनिधी**

छत्रपती शाहू महाराज सामाजिक सभागृह व नाट्यगृह संकुल खोपोलीचे वैभव व शहराचे सांस्कृतिक अधिष्ठान आहे, मात्र वर्तमान स्थितीत या सभागृहाची भयानक स्थिती बनली आहे. कोरोनाच्या पहिल्या लाटेपासून सतत चार वर्षे हे सभागृहबंद असून विद्यमान स्थितीत मोडकळीस येते आहे.

दरम्यानच्या काळात हौशी नाट्यकर्मी उल्हासराव देशमुख, दिग्दर्शक प्रवीण पुरी, सामाजिक कार्यकर्ते गुरुनाथ साठेलकर, नितीन भावे, निशा दळवी व अन्य नाट्यप्रेमींच्या पुढाकाराने नाट्यगृह बचाव मोहीम सुरू करण्यात आली. या अंतर्गत जिल्हाअधिकारी, स्थानिक आमदार, खासदार व पालकमंत्री तसेच राज्याच्या सांस्कृतिक विभागाकडे हे नाटचगृह पूर्ववत सुरू होण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतरही हालचाली होत आमदार महेंद्र थोरवे यांच्या विशेष प्रयत्नांनी डागडुजीसाठी विशेष निधी अंतर्गत पाच कोटी निधी मंजूर करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतरही नाट्यगृहाची दूरवस्था मात्र कायम आहे. सद्यस्थितीत या सभागृहाच्या रक्षणासाठी पालिकेकडून वॉचमन नियुक्त करण्यात आला असला तरी मैदानात लहान मुले क्रिकेट खेळत असून, अन्य आक्षेपार्ह बाबी येथे होत आहेत. नाट्यगृहातील अनेक किमती साहित्य गायब होत आहे, तसेच मोडकळीस आले आहे. काही साहित्य तुटून पडत आहे. मागील दोन वर्षे लोकप्रतिनिधींची मुदत संपल्यावर पालिकेचा संपूर्ण प्रशासकीय कारभार मुख्याधिकारी अनुप दुरे-पाटील यांच्या हातात व आत्ता डॉ. पंकज पाटील यांच्या हातात आहे. त्यामुळे मुख्याधिकाऱ्यांनी तातडीने नाट्यगृहाची डागडुजी करावी अशी मागणी नाटचकर्मी व सर्वसामान्य नागरिक करीत आहेत.

## कशेडी घाटात केमिकल टँकर उलटला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटात भोगावच्या हद्दीत खचलेल्या घाटरस्त्यावर केमिकल वाहतूक करणारा टँकर आडवा होऊन अपघात झाला. या अपघातातून सुदैवाने चालक बचावला आहे.

कशेडी टॅप आणि पोलादपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चालक अंकित राजेश कुमार यादव (वय ३०रा.प्रतापगड, राणीगंज, उत्तर प्रदेश) हा आपल्या ताब्यातील टँकर (जीजे १३ बीडब्ल्यू ३५४४) घेऊन लोटे ते दौंड पुणे असा जात असताना कशेडी घाटात घाटरस्त्यावर आला असता खचलेल्या रस्त्याचा अंदाज न आल्याने टँकर उलटून महामार्गावर असणाऱ्या दगड मातीच्या ढिगाऱ्यावर आडवा झाला. या टँकरमध्ये ज्वालाग्रही आणि प्रदुषणकारी नसलेले फोम केमिकल असल्याने मोठी दुर्घटना टळली.

या घटनेची माहिती मिळताच कशेडी महामार्ग वाहतूक पोलीस मदत केंद्राचे पोलीस उपनिरिक्षक समेळ सुर्वे, हवालदार शंकर कुंभार, रामागडे, चिकणे यांनी तातडीने धाव घेत मदतकार्य करून एकेरी वाहतूक सुरू ठेवली.



## पेणमध्ये दिव्यांगांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

महसूल पंधरवड्यानिमित्त एक हात मदतीचा दिव्यांगांच्या कल्याणाचा या उपक्रमांतर्गत पेणमधील उपजिल्हा रुग्णालय येथे दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून त्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास पेणचे नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. रजपूत, सुशील साईकर, पांडुरंग गाडे, दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष अकील पठाण आदींसह रुग्णालयाचे कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.



या वेळी बोलताना प्रसाद कालेकर यांनी महसूल पंधरवडा निमित्त पेण तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींसाठी हा कार्यक्रम राबवल असल्याचे सांगितले, तर आदिवासी समाजाचे जातीचे दाखले, त्यांची शिधापत्रिका व इतर आदिवासी योजनाही त्यांच्यापर्यंत पोहोचवल्या जात असून असे विविध कार्यक्रम या पंधरवड्यात घेतले जात असल्याचे कालेकर म्हणाले.

या शिबिरात अलिबाग जिल्हा रुग्णालयातील अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. पंकज पाटील, कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. निशिकांत पाटील, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. समृद्धी दलाल, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अर्चना सिंग, सर्जन डॉ. वैभव पाटील, सामाजिक कार्यकर्ता सुशील साईकर, ज्ञानदीप भोईर, विशाल दामोदर, समुपदेशक अक्षय गोरे, भौतीकोपचार तज्ज्ञ प्रतिष्ठान नाखवा व सहकाऱ्यांनी उपस्थित दिव्यांगांची तपासणी केली. त्यानंतर या साऱ्या दिव्यांगांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

## मुरूड एसटी आगारात दोन सीएनजी बस दाखल

**मुरूड : प्रतिनिधी**

एसटी आगारात बऱ्याच वर्षांनी एमएस बॉडीच्या दोन सीएनजी बसेस दाखल झाले आहेत. त्यामुळे आता एसटी प्रवास डिझेल एवजी सीएनजी प्रवास होणार आहे. यामुळे एसटी डेपो प्रदुषणमुक्त होणास मदत मिळणार आहे.

सीएनजी बसची १० टनाची क्षमता असून या बसच्या खाली दोन सीएनजी सिलेंडर बसविण्यात आले आहे. यामध्ये १०० किलो सीएनजी गॅस भरता येणार असून याचा प्रवास ४०० किमीपर्यंत होणार आहे. यामुळे एसटी महामंडळाचा रोज शेकडो लिटरचे डिझेल वाचणार आहे.

या संदर्भात आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांनी सांगितले की, मुरूड डेपोत दोन सीएनजी बसेस दाखल असून



या बसेस मुरूड-बोरिवली व मुंबई मार्गावर सुरू केल्या आहेत. आपल्याकडे सीएनजी गॅसची सेवा नसल्याने येताना चालक पेण आगारातून सीएनजी गॅस भरून पुन्हा मुरूडकडे येत असतात. या सीएनजीमुळे डेपो फायद्यात आहे. यामुळे मी अजून १० सीएनजी बसेसची मागणी पेण विभागीय वाहतूककडे केली आहे.

## नेरळमधील भाजप कार्यालय जनसेवेचे मुख्य केंद्र बनावे-किरण ठाकरे

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात भारतीय जनता पक्षाचे नियोजनबद्ध कार्य सुरू आहे. त्यात नेरळ येथील भाजप संपर्क कार्यालय हे जनतेची अपेक्षा पूर्ण करणारे केंद्र बनले पाहिजे असा विश्वास भाजप कर्जत विधानसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांनी व्यक्त केला. नेरळ येथे भाजप जिल्हा परिषद गटाचे जनसंपर्क कार्यालय सुरू झाले. त्या वेळी ठाकरे बोलत होते.



नेरळ येथे भाजपचे जि.प. गटाचे विभागीय कार्यालय सुरू करण्यात आले. या कार्यालयाचे उद्घाटन भाजप नेरळ शहर अध्यक्ष संभाजी गरुड यांनी फित कापून तर प्रवीण गायकवाड यांनी श्रीफळ वाढवून केले. त्या वेळी भाजपचे कर्जत विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती, तसेच भाजप कर्जत तालुका उपाध्यक्ष नरेश मसणे, कर्जत भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्षा नम्रता कांदळगावकर, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष प्रदणेश खेडकर, भाजप कर्जत तालुका माजी सरचिटणीस संजय कराळे आदी प्रमुख उपस्थित होते.

या वेळी नेरळ ग्रामपंचायत माजी सदस्य श्रद्धा कराळे, साधना जाधव, नेरळ शहर उपाध्यक्ष नरेंद्र कराळे, योगेश ठक्कर, केवल दहीवलिकर, अक्षय पेमारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रदनेस खेडकर यांनी परिवर्तन मंच कर्जत तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडविण्यात आघाडी घेत असल्याचे दिसून येत आहे. त्यातून कर्जत तालुक्यातील भाजपची पालेमुळे घट्ट रोवण्यात मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

## नाते गावामध्ये कृषि माहिती केंद्र व रानभाज्या प्रदर्शन

**महाड : प्रतिनिधी**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली संलग्न कृषि महाविद्यालय आचळोलीच्या वतीने नाते गावातील सी. डी. देशमुख हॉल येथे कृषि माहिती केंद्र व रानभाज्या प्रदर्शन झाले.



महाड येथील कृषि कन्यांमार्फत कृषि माहिती केंद्र व रान भाज्या प्रदर्शन यांची माहिती भीत्तीपत्रकांद्वारे करून देण्यात आली. प्रदर्शनात विविध प्रकारच्या रानभाज्यांचे गुणधर्म व ओळख सांगण्यात आली, तसेच आधुनिक पिकांच्या जाती, संशोधनातून निर्माण केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाची शेतीसाठी लागणारी अवजारे दर्शवण्यात आली होती. कार्यक्रमाला उद्घाटक महाड तहसीलदार महेश शितोळे यांनी शेतकऱ्यांना शेतीसंदर्भ विकासासाठी असलेल्या विविध योजनांची महिती सांगितली. त्याचबरोबर कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.जे.गिम्हवणेकर यांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व सांगितले व शेती संबधीत कोणतीही अडचण कृषि महाविदयालयाद्वारे दूर करण्यात येतील, असे आवाहन शेतकऱ्यांना केले.

कार्यक्रमात महाड कृषि अधिकारी धिरज तोरणे, कृषि पर्यवेक्षक किरण कोकरे, कृषि मंडळ अधिकारी भरत कदम, नाते गावचे कृषि सहाय्यक आकाश रुपणार, नाते सरपंच युवराज पोवळे, उपसरपंच समीर पाथरे व तलाठी, ग्रामसेविका, ग्रामस्थ उपस्थित होते.

## रोह्यात हर घर तिरंगा अंतर्गत बाईक रॅली

**रोहा : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून हर घर तिरंगा ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत रोहा शहरात नगर परिषदेच्या वतीने शनिवारी (दि.१०) शहरातून बाईक रॅली काढण्यात आली आहे. रॅलीत कर्मचारी व शिक्षक आपल्या हातात तिरंगा घेऊन या रॅलीत सहभागी झाले होते.

ज्येष्ठ नागरिक सभागृह, नगरपालिका, सागर डेअरी, मेहेंदळे हायस्कूल, राम मारुती चौक, बाजारपेठ, तीनबत्ती नाका, रोहा एसटी स्टँड पुन्हा रोहा नगरपालिकेपर्यंत ही रॅली काढण्यात आली. नगर परिषदेचे विशाल काळे, निवास पाटील, सुधीर भगत, रचना पार्टे, प्रसाद शिंदे,



जयेश भांबरकर, रवी आयनोडकर, अमित पाटील, राजेश सांबरे, आनंद बंडगर, निलेश चाळके, किशोर देशमुख, क्लाबसर, संजय शिंदे आदीसह नगर परिषद अधिकारी, कर्मचारी, शिक्षक सहभागी झाले होते.

# वाहतूक शाखेतर्फे वाहनचालकांचे प्रबोधन



**उरण : प्रतिनिधी**

न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या वतीने जेएनपीए परिसरातील ट्रेलर, रिक्षा आदी वाहनचालकांना रस्ता सुरक्षा व वाहतुकीचे नियमांची माहिती देऊन प्रबोधन केले.

जेएनपीए परिसरातील क्रिश फूड इंडस्ट्री, पीयूबी जंक्शन, जेएनपीटी एसईझेड आदी ठिकाणी प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी विविध कंपन्यांचे कर्मचारी व ट्रेलर, रिक्षा चालक आदी उपस्थित होते. उपस्थितांना न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम. मुजावर यांनी रस्ता सुरक्षा व वाहतुकीचे नियमांची माहिती देऊन प्रबोधन केले.



## ‘वाहतूक नियम पाळा, अपघात टाळा’

**पनवेल : वार्ताहर**

अवजड वाहन चालविताना वाहन चालकाने नेहमी काळजी घेणे आवश्यक आहे. दारू पिऊन वाहने चालवू नये त्यामुळे अपघाताला निमंत्रण मिळते. वाहन चालविताना योग्य नियम पाळले तर अपघाताचे प्रमाण कमी करता येऊ शकते, असे प्रतिपादन गव्हाण फाटा वाहतूक शाखेचे पोलीस निरिक्षक नितीन बडगुजर यांनी केले.

नवी मुंबई वाहतुक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली गव्हाण फाटा येथे अवजड वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी प्रबोधनपर कार्यक्रम झाला. त्यावेळी ते बोलत होते. अनेकदा काही कारणांमुळे अवजड वाहनांना प्रवेश बंद केला जातो, त्यावेळी पर्यायी मार्गाचा वापर कसा करावा. नेहमी सिटबेल्ट लावावा. वेग नियंत्रणात ठेवावा. ओव्हरटेक च्या नादी लागू नये. सुरक्षित प्रवासासाठी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असेही श्री. बडगुजर यांनी सांगितले.

परिसरातील टॅक्सी थांबे, ढाबे, हॉटेल या ठिकाणी विश्रांतीसाठी थांबलेल्या वाहनचालकांना पोलिसांनी प्रत्यक्ष जाउन मार्गदर्शन केले. या वेळी हवालदार हिरामण महाले, प्रशांत शिंदे, गणेश पाटील, राजेंद्र पाटील, राहुल काचरे, महेश खांडेकर उपस्थित होते.

## ‘प्रवाशांचा जीव, त्यांची सुरक्षा जपावी’

**कळंबोली : बातमीदार**

समाजात वाढत असलेले अपघाताचे प्रमाण व त्यातून चालकांनी आपले व आपल्या समवेत असलेल्या प्रवाशांचे जीव व त्यांची सुरक्षा कशी जपावी, वाहतुकीचे नियम पाळताना कोणती दक्षता घ्यायची अपघात घडल्यानंतर कोणती काळजी घ्यायची, आरटीओ, पोलीस प्रशासनाने घालून दिलेले नियमांचे पालन कशाप्रकारे राखायचे याबाबतचे प्रबोधन कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बनकर यांनी चालकांसमवेत केले.



यामध्ये मोठ्या संख्येने चालक वर्ग उपस्थित होता. विविध प्रकारचे नियम व उपाययोजनांबाबत माहिती मिळाल्याने चालकांनीही या उपक्रमाबाबत आनंद व्यक्त केला.

कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साठे व पथक यांनी शुक्रवारी सकाळी कामोठे एमआयडीसीजवळील सीएनजी पेट्रोल पंपाजवळ कारचालकांना चार चाकी वाहन चालक व प्रवासी यांना चाइल्ड शीट बेल्ट आणि मागील सीटवरवरील प्रवाशांनी शीट बेल्ट लावण्याबाबत प्रबोधन व मार्गदर्शन केले.

सर्व प्रकारच्या कार वरील वाहन चालक व प्रवाशांनी वाहन चालवताना घ्यावयाच्या काटेकोर पालना बाबत केलेल्या प्रबोधनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन कळंबोली वाहतूक शाखेच्या पोलिसांच्या सामाजिक उपक्रमाबाबत आनंद व्यक्त केला.

# सांस्कृतिक स्पर्धेत ‘सीकेटी’ला विजेते पद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस् कॉमर्स आणि सायन्स कॉलेज ने कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय, कर्जत येथे झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या ५७व्या अंतर महाविद्यालय युवा महोत्सव उत्तर रायगड विभागातील सांस्कृतिक स्पर्धेच्या प्राथमिक फेरीमध्ये २२ पारितोषिके प्राप्त करून आपली यशस्वी वाटचाल कायम राखली आहे.

दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेमध्ये उत्तर रायगड विभागातून एकूण २८ महाविद्यालयाने सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये नृत्य, अभिनय, साहित्य, फाईन आर्ट व संगीत या कला प्रकारातील एकूण ३२ वैयक्तिक आणि सांघिक प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

सीकेटी महाविद्यालयाने सर्वच्या सर्व स्पर्धा प्रकारांमध्ये सहभाग घेतला होता. ३२ स्पर्धा प्रकारांचे निकाल जाहीर करण्यात आले. जाहीर झालेल्या स्पर्धेच्या निकालापैकी महाविद्यालयाने २२पारितोषिक प्राप्त केले यामध्ये आठ प्रथम, ११ द्वितीय,३ तृतीय क्रमांकाची पारितोषिके महाविद्यालयास प्राप्त करत सलग २० वर्ष रायगड जिल्हा विभागीय चॅम्पियनशिप जिंकण्याचा बहुमान मिळविला आहे.

सन २००५ते २०२४या वीस वर्षांमध्ये चांगु काना ठाकूर महाविद्यालयाने या स्पर्धेमध्ये सर्वाधिक पारितोषिक प्राप्त केली आहेत. यावर्षीही सर्वाधिक पारितोषिक प्राप्त करून सांस्कृतिक क्षेत्रात रायगड जिल्ह्यात निर्विवाद वर्चस्व प्राप्त केले आहे.

सर्व पारितोषिक विजेत्या विद्यार्थी, महाविद्यालयाच्या सांस्कृतिक चमू व सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. गीतीका तन्वर व सांस्कृतिक समन्वय गणेश जगताप यांनी प्राप्त केलेल्या दैदिप्यमान यशाचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टि. देशमुख, अनिल भगत, परेश ठाकूर, संस्थेचे सर्व कार्यकारी मंडळाचे सदस्य, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षक इतर सेवक वर्ग यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

### स्पर्धेतील विजेत्यांचे नावे

शिल्पकला स्पर्धेत प्रथम मयूर ठोंबरे, कोलाज स्पर्धेत प्रथम शाहू सलगरे, वत्कृत्व (हिंदी) स्पर्धेत प्रथम निशा जांगीड, कथाकथन (मराठी) स्पर्धेत प्रथम कृष्णाली जोशी, कथाकथन (हिंदी) स्पर्धेत द्वितीय निशा जांगीड, वत्कृत्व (मराठी) स्पर्धेत द्वितीय कृष्णाली जोशी, कार्टूनिग स्पर्धेत द्वितीय सोनल वाघमारे, मेहंदी स्पर्धेत द्वितीय मास्टर झिकरा, एकपात्री (मराठी) स्पर्धेत द्वितीय सानिका पाटील, एकपात्री (हिंदी) स्पर्धेत द्वितीय परीन मोरे, पाश्यात्य गायन स्पर्धेत तृतीय सुशांत खिल्लारे, नाट्यसंगीत स्पर्धेत तृतीय ऋतुजा गाडगे. वादविवाद स्पर्धेत प्रथम प्रिया चौधरी आणि कृष्णाली जोशी, एकांकिका (मराठी) स्पर्धेत प्रथम विजया नाखवा आणि संघ, एकांकिका (हिंदी) स्पर्धेत प्रथम परीनं मोरे आणि सानिका पाटील, लघुनाटक (मराठी) स्पर्धेत प्रथम प्रणव शेडगे आणि संघ, वादविवाद (हिंदी) स्पर्धेत द्वितीय निशा जांगीड आणि आकांशा पाटील, भारतीय ग्रुप गायन स्पर्धेत द्वितीय अंकिता पाचांगने, आणि संघ, पाश्यात्य समूह गायन स्पर्धेत द्वितीय मोनालिसा सामंत आणि संघ, भारतीय लोक नृत्य स्पर्धेत द्वितीय अथर्व पाटील आणि संघ, लघुनाटक (हिंदी) स्पर्धेत द्वितीय क्षितिज गायकवाड आणि संघ, मूकनाट्यं स्पर्धेत तृतीय आर्यन अन्सारी आणि संघ.









**नवीन पनवेल : येथील ’एआय एक्सपेरिमेंटल लॅब’चे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. यानंतर भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी लॅबला भेट दिली. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.**

# निवडक

## केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चासत्र

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले गेले. महाविद्यालयाची प्राचार्य के.ए.शामा हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख मार्गदर्शक प्राध्यापक डॉ. ए.आर. चव्हाण हे असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. आभार प्रा. आर.टी. ठवरे यांनी मानले. कार्यक्रमात डॉ. पराग कारुळकर, प्रा. विनिता तांडेल व राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम झाले. यामध्ये त्यांनी वृक्षारोपण, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांचा मानसन्मान, त्याचप्रमाणे महिला कार्यकर्त्यांना मोफत साड्या वाटपाचा कार्यक्रम केला. वडघर येथे अभिष्टचिंतन सोहळा झाला. या कार्यक्रमाकरीता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सागर संसारे, युवा नेते अनिकेत संसारे, अशोक वाघमारे, विजय पवार आदींसह पनवेल तालुक्यातील अनेक स्वाभिमानी युवक रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते, सामाजिक धार्मिक संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## गजानन खारपाटील यांचा स्मृतिदिन

**पनवेल :** रायगड जिल्हा परिषदेने आदर्श शिक्षक, शिवभूमी शिक्षक, उत्कृष्ट वक्ता म्हणून सन्मानित केलेले कैलासवासी गजानन गणू खारपाटील यांचा चतुर्थ स्मृतिदिन चिरनेर येथे भक्तिपूर्ण वातावरणात झाला. गुरुजींच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांच्या पत्नी, आदर्श शिक्षिका शारदा गजानन खारपाटील यांनी चिरनेर हायस्कूलला २० हजार रुपये देणगी दिली. गुरुजींच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र मिलिंद खारपाटील यांनी रायगड, रत्नागिरी, मुंबई या जिल्ह्यातील वाचनालयांना पाच लाख रुपयांची पुस्तके भेट दिली आहेत. पनवेलमध्ये ७५ हून अधिक वड आणि पिंपळ वृक्षांची लागवड केली आहे. चिरनेर आश्रम शाळेत कपाट भेट दिले आहे.



## उरण महाविद्यालयाचे यश

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या संघाने मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित ५७ व्या सांस्कृतिक युवा महोत्सवात घवघवीत यश मिळवले. कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालय कर्जत येथे रायगड झोनच्या स्पर्धा झाल्या. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पराग कारुळकर, प्रा.हन्नत शेख सर्व सांस्कृतिक कमिटीचे सदस्य यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी प्रदीपचंद्र शृंगारपुरे महाविद्यालयाचे प्राचार्य के.ए. शामा, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती



पनवेल : डॉ.एस.आर.रंगनाथन हे एक भारतीय गणितज्ञ आणि पुस्तकालय तज्ञ होते. त्यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी (दि. ९) के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. सर्व प्रथम संस्थेचे सदस्य सुनील खेडेकर यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा अॅड. सुनीता जोशी यांनी, ग्रंथपाल निकिता शिंदे, सहाय्यक ग्रंथपाल संपदा शार्दुल जोशी, लिपिक हर्षिता तुरकर, सेवक संजय दिवटे, संस्थेचे वाचक सभासद दत्तात्रय जाधव, रमेश चव्हाण, राजकुमार ताकमोगे आदी उपस्थित होते.

## दुचाकीच्या धडकेत वृद्ध महिला जखमी

**पनवेल : वार्ताहर**

मोटरसायकलच्या धडकेत एक वृद्ध महिला जखमी झाल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे. शनमुथन मेनोथ (वय ६७) या आपल्या मुलीला कॉलेजला सोडून दुचाकीवरून घरी येत होत्या. या वेळी सीएनजी पंपासमोर दुसऱ्या मोटरसायकलने त्यांच्या गाडीला धडक दिली. यात त्या खाली पडून जखमी झाल्या. या अपघाताची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# गव्हाण विद्यालयात ऑगस्ट क्रांती दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील क्रांती पर्वाचा मानबिंदू ठरलेल्या ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शुक्रवारी (दि. ९) क्रांती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

यानिमित्त इयत्ता नववी ब ह्या वर्गातर्फे आयोजित करण्यात आलेल्या क्रांतीदिन सोहळ्यात क्रांतीकारक देशभक्तांच्या चिरंतन स्मृतींना उजाळा देण्यासाठी काही देशभक्तांच्या वेशभूषेत विद्यार्थी विद्यालयाच्या प्रांगणात अवतरले. विद्यालयाच्या सांस्कृतीक विभागप्रमुख एच.आर पाटील यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या ह्या वेशभूषांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या वेळी यज्ञ मोकल (लोकमान्य टिळक) भारत माता (आरोही नाळे) वीर सावरकर (वैष्णव देशमुख) झाशीची राणी लक्ष्मीबाई (नव्या पाटील) यांच्या भूमिका लक्षवेधी ठरल्या. या वेळी सिद्धांती सुतार आणि अश्मिरा शेख या विद्यार्थिनींनी क्रांती दिनाचे महत्त्व आपल्या बाणेदार शैलीत व्यक्त केले.

मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांचे हस्ते क्रांतीज्योती प्रज्वलीत करण्यात आली. या वेळी उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, एकनाथ ठाकूर आणि इतर उपस्थीत सर्व रयत सेवकांनी क्रांतीज्योत प्रज्वलीत करून क्रांतीदिन उत्साहात साजरा केला.

या वेळी ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, परदेशी पी.एन, शितलकुमार म्हात्रे, संदीप भोईर, जोत्सना कोळी, सोनाली घरत, सुजाता शेलार, योगिता पाटील या सर्व रयत सेवकांनी आपली उपस्थिती दाखवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार एच.आर. पाटील मॅडम यांनी मानले.

## आठवणींच्या रंगीत चिमण्या कादंबरीवर दुसरे चर्चासत्र

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील प्रसिद्ध लेखक/कवी गज आनन म्हात्रे यांच्या आठवणींच्या रंगीत चिमण्या या कादंबरीवर ’नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ नवी मुंबई’ या संस्थेने ’टाऊन लायब्ररी वाशी’ यांच्या सहकार्यातून चर्चासत्राचे आयोजन केले होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रमोद जी कर्नाड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिव मंदिर वाशीचे विश्वस्त रामभाऊ पाटील हे होते. टाऊन लायब्ररीचे विजय केदारे, नाट्य दिग्दर्शक रवी वाडकर, पारसिक बॅन्केचे सीईओ ’पै’, दै. लोकमतचे जाहिरात व्यवस्थापक विनोद भांडारकर हे मान्यवर उपस्थित होते.

कवी/ पत्रकार राजेंद्र बनसोड यांनी कादंबरीचे लेखन सत्वशील असल्याचे सांगितले. कवियत्री पाकिजा आत्तार यांनी कादंबरीत असलेल्या जुन्या लोकपरंपरा रंजकपणे लिहिल्या असल्याचे सांगितले लेखकाने आठवणींच्या माध्यमातून समाजाचा गतकाळ प्रकाशात आणला आहे. जनसंवादनी ठाण्याचे व्याख्याते योगेशचंद्र लोहाकरे यांनी ही कादंबरी आपल्या डोळयांसमोर गतकाळ उभा करते.

चर्चासत्राचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक प्रमोदजी कर्नाड म्हणाले की, लेखक गज आनन म्हात्रे यांनी ’खाडीवरच्या माडी’ या गाजलेल्या कादंबरी नंतर दुसरी कादंबरीही सकस दिली आहे. कादंबरीत लेखकाने प्रांजळपणा जपला आहे. लेखक गज आनन म्हात्रे यांनी आठवणींचा आनंद घेण्यासाठीच मी ही कादंबरी लिहिली असे ते म्हणाले. येत्या ८ जून २४ रोजी साठावा वाढदिवस असून त्या दिवशी संपूर्ण दिवस ’नवरंग साहित्य संमेलन’ घेत असल्याचे त्यांनी जाहीर केले. कवी/ लेखक घनश्याम परकाले यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

राम प्रहर

## श्रावणधारा

### पाऊस

ढंगाच्या गडगडाचा ढोल वाजला
विजाच्या कडकडाटाने आसमंत उजळला
गारगार थेबांचा स्पर्श होताच
ओल्या-मातीचा सुंगध दरवळला

तप्तलेल्या धरणीला चिंब
भिजावेसे वाटले
थेंब - थेबे अंगावर
घेऊन तृप्त व्हावेसे वाटले

पसरला गारवा, झाडे बहरली
मिठी मारण्या तरुस सज्ज झाल्या वेली
पावसाची सर घेऊन अंगावर
फुलवून पिसारा नाचू लागला मयूर

चाहूल लागताच पावसाची
बळीराजाही सुखावला
तिफन घेऊन सखी संगे
सज्ज होऊन, निघाला नांगरणीला

कृष्ण-धवल मेघातून
सूर्य जसा डोकावला
ऊन-पावसाच्या खेळात
इंद्रधनु अवतरला

कधी रौद्र, कधी शांत, कधी खट्याळ
असा हा अवखळ पाऊस
जनमनास सुखावतो



-साक्षी संदीप आंग्रे,
पनवेल

# ‘घरोघरी तिरंगा’द्वारे देशप्रेमाचा जागर



**रायगड : रामप्रहर वृत्त**

आपल्या राष्ट्र ध्वजातील तिरंगा रंग केशरी, पांढरा आणि हिरवा हे रंग त्याग, धैर्य, प्रेम, शांतता आणि विश्वासाचे प्रतीक आहेत. घरोघरी तिरंगा अभियानाच्या माध्यमातून देशप्रेमाचा जागर होणार आहे. हे अभियान संपूर्ण जिल्ह्यात लोकसहभागातून प्रभावीपणे राबविले जात असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

जिल्हा प्रशासन आणि अलिबाग नगरपालिका यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालय आवार येथे घरोघरी तिरंगा (हर घर तिरंगा) अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हाधिकारी डॉ.रविंद्र शेळके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) राजेंद्र भालेराव, अलिबाग उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे, तहसीलदार विक्रम पाटील, गट विकास अधिकारी दाजी धाईंगडे,जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प. श्याम कदम देशमुख अलिबाग नगरपालिका मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांसह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यात यावर्षीही अडीच कोटी घरावर तिरंगा फडकवला जाणार आहे. देशप्रेमाची भावना त्याद्वारे जागवली जाणार आहे. विविध दुकाने, आस्थापना यांच्यावरही तिरंगा फडकवला जाणार आहे. मोठया उत्साहात आणि जल्लोषात हे अभियान साजरे करण्यात येत आहे. घरोघरी तिरंगा अभियान आपल्याला सातत्याने त्यागाची आणि बालिदानाची आपल्याला सतत जाणीव करून देईल. रॅली, पदयात्रा, तिरंगा सेल्फी, स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार अशा माध्यमातून हे अभियान साजरे करायचे आहे. सर्वांच्या सहकार्यातून हे अभियान यशस्वी होईल, असा विश्वास जावळे यांनी व्यक्त केला.

तिरंगा पदयात्रेस जिल्हाधिकारी श्री.जावळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. तसेच त्याठिकाणी असलेल्या घरोघरी तिरंगा अभियानाच्या सेल्फी पॉईंटवर सेल्फीही घेतली. या वेळी जावळे यांनी उपस्थितांना तिरंगा प्रतिज्ञा दिली. या कार्यक्रमास विविध मान्यवरांसह शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माथेरानमध्ये रस्त्याच्या कामाला सुरुवात



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल शॉपिंग सेंटरच्या रस्त्याची अवस्था दयनीय झाली होती. तक्रार करून पण अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत होते. अखेर नागरिकांनी सोशल मिडियाद्वारे आपला संताप व्यक्त केला. यावर अधिकारी वर्गाने तत्काळ रस्ता दुरुस्तीचे काम सुरू केले असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

माथेरान शहरतील वीर हुतात्मा भाई कोतवाल शॉपिंग सेंटर रेल्वे स्टेशन जवळ असल्याने व नामांकित हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर असल्यामुळे येथीलपरिसरात पर्यटकांची व नागरिकांची नेहमीच वर्दळ असते तसेच येथील रस्ता हा उताराचा असून पावसाच्या पाण्यामुळे येथील रस्त्याचे क्ले-पेव्हर ब्लॉक निखळून गेल्याने या रस्त्याला जागोजागी खड्डे पडून रस्त्याची पूर्ण दुरवस्था झाली होती. रस्त्यावरून चालताना अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. याबाबत पालिकेला निवेदन देऊन देखील रस्त्याकडे दुर्लक्ष केले जात होते. अखेर नागरीकांचा संताप अनावर होऊन त्यांनी सोशल मिडियाद्वारे अधिकाऱ्यांवर टीका करीत आपला रोष व्यक्त केला. हुतात्म्यांचे नाव दिलेल्या रस्त्याचे काम त्वरित सुरू करावे व रस्त्याची सुधारणा करून रस्ता सुस्थितीत करावा, अशी मागणी केली.

यावर अधिकारी वर्गाने याची दखल घेत तात्काळ रस्त्याचे काम सुरू केले आहे. निखळलेले ब्लॉक लावण्याचे काम सुरू झाल्याने येथील दुकानदारांनी समाधान व्यक्त केले.

**वीर हुतात्मा भाई कोतवाल रस्त्याची खूपच दुरवस्था झाली होती. दुकानदारांनी पालिकेला निवेदनही दिले. रस्त्याची चाळण झाली तरी कोणी लक्ष देत नव्हते. जर पालिका रस्ता करत नसेल तर आम्ही रस्त्याचे काम सुरू करतो असे आवाहन आम्ही सोशलमिडिया मधून केल्यावर तात्काळ रस्त्याला पॅचवर्क करण्याचे काम सुरू झाले आहे.**

**-प्रदीप घावरे, भाजप शहर संपर्क प्रमुख तथा माजी नगरसेवक माथेरान**

## खोपोली नगर परिषदेतर्फे हर घर तिरंगा मोहिमेस प्रारंभ

**खोपोली : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सववर्षा निमित्त केंद्र शासनाकडून हर घर तिरंगा या मोहिमेस प्रारंभ करण्यात आला आहे.



महाराष्ट्र राज्यशासनाने ही मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन केले आहे. या पार्श्वभूमीवर १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत नगरपरिषद हद्दीत प्रत्येक घरी इमारतीवर राष्ट्रध्वज उभारणीसाठी नागरिकांना प्रोत्साहित करण्यासाठी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांती दिनी ९ ऑगस्ट रोजी बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, यात सर्व अधिकारी, विभाग प्रमुख त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. शहराच्या सर्व प्रभागांमध्ये या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी हर घर तिरंगा ही मोहीम प्रभावीपणे राबवावी, असे आवाहन मुख्याधिकारी तथा प्रशासक पंकज पाटील यांनी नागरिकांना केले आहे.

## कारिवणे येथे शैक्षणिक साहित्य, छत्री वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

दक्षिण रायगड जिल्हा युवा मोर्चा चिटणीस नरेश कोकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यातील राजिप शाळा कारिवणे येथे भाजपा रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गावातील गरजु नागरिकांना बुधवारी छत्रीचे वाटप करण्यात आले.

माझा वाढदिवस हा मी नेहमीच लहान मुलांसोबत साजरा करतो. कारण ज्या शाळेत पहिली पासून शिकलो त्यांच्या शाळेत माझ्या वाढदिवसाचे औचित्य साधून येथील विद्यार्थ्यांना काही देऊ शकलो या पेक्षा कोणताच आनंद नाही, असे उदगार नरेश कोकरे यांनी कार्यक्रमदरम्यान केले.

या वेळी भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, रोहा भाजप आयटीसीएलचे अध्यक्ष निखिल बोरोले, नितीन कोकरे, मुख्याध्यापक अतुल हमेश बोंद्रे यासह ग्रामस्थ, विद्यार्थी तसेच भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.



## आदिवासी दिनानिमित्ताने रोह्यात विविध कार्यक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुका आदिवासी कातकरी समाजाच्यावतीने जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने रोहा तालुक्यातील आदिवासी समाज बांधव मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. तालुक्यातील १०५ कातकरी आदिवासी वाड्यातील समाज बांधव सहभागी झाले होते.

रोहा तालुका आदिवासी कातकरी समाजाच्यावतीने जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने रोहा शहरात भव्य रॅली काढण्यात आली होती. सकाळी बारा वाजताच्या सुमारास रोहा कुंडलिका नदी संवर्धन येथून भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीत आदिवासी बांधव पारंपारिक वेशभूषा परिधान करून सहभागी झाले होते. हातात विविध बॅनर होते, विशेषता युवक व महिलांची उपस्थिती लक्ष्णीय होती. कुंडलिका नदी संवर्धन येथून ही रॅली सुरुवात करण्यात आली. ही रॅली नवरत्न हॉटेल, दमखाडी नाका, राष्ट्रमाता जिजामाता चौक, नगर परिषद चौक रोहा एसटी स्टँड, तीन पत्ती नाका, फिरोज टॉकीज ते तहसीलदार कार्यालयपर्यंत रॅली काढण्यात आले. ही रॅली पुढे तहसीलदार यांना निवेदन देत मराठा समाज भवन म्हाडा कॉलनी येथे समाप्त करण्यात आले.


या ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने दिवसभरामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये बाईक रॅली, मिरवणूक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. समाजाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

या रॅलीत रोहा तालुका आदिवासी कातकरी समाज संघटनेचे दयाराम पवार, सौ. गुलाबताई, सुरेश जाधव निमेश वाघमारे, पांडुरंग वाघमारे, गुलाबताई वाघमारे, शशिकांत जगताप, तुळशीराम पवार, विकास कोळी, चंद्रकांत जाधव यासह रोहा तालुक्यातील नागोठणे सुकेळी विभाग, खांब विभाग, कोलाड विभाग, चणेरा विभाग, रोहा विभाग, शेणवई विभाग, तांबडी विभाग, कुडली विभागातील नेते, कार्यकर्ते, आदीवाशी समाजबांधव उपस्थित होते.



## कर्जत तालुक्यात जागतिक आदिवासी दिन साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**



आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन कर्जत तालुक्यात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाने एकत्र येत कर्जत तालुक्यात मोटरसायकल रॅली काढून उत्साहात आदिवासी दिन साजरा केला.

जागतिक आदिवासी दिनाचे निमित्ताने कर्जत तालुक्यातील आदिवासी समाजाने एकत्र येत मोटरसायकल रॅली काढली. नेरळ येथील कोतवाल वाडी ट्रस्ट मधील क्रांती स्तंभ येथे अभिवादन करून ही रॅली निघाली. तेथून मोहाची वाडी येथील हुतात्मा बुरसा मुंडा यांच्या चौकात जल्लोष करीत रॅली खांडा गावातून नेरळ बाजारपेठ येथे आली. साधारण एक हजार दुचाकी आणि अन्य वाहने यांची उपस्थिती या आदिवासी दिनाच्या रॅलीमध्ये असल्याने नेरळ बाजारपेठमध्ये वाहतूक कोंडी झाली होती.

हुतात्मा भाई कोतवाल चौक येथे अभिवादन करून ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि हुतात्मा हिराजी पाटील चौक येथे थांबली. तेथे आदिवासी महिला आणि पुरुष यांनी आपल्या आदिवासी संस्कृतीचे प्रदर्शन करणारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यानंतर रॅली माथेरान नाक्यावर असलेल्या हुतात्मा चौक येथे पोहचली. तेथे हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या अर्ध पुतळ्यांना अभिवादन करून रॅली नेरळ कर्जत रस्त्याने कर्जत शहरात पोहचली.

कर्जत शहरातदेखील अभुतपूर्व वाहतूक कोंडी पाहायला मिळाली. शहरात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे अभिवादन करून रॅली कर्जत मुरबाड रस्त्याने कशेळे येथे पोहचली. त्यात कर्जत येथे आदिवासी समाजाचे वतीने कपालेश्वर मंदिर येथील लोकमान्य टिळक चौकात सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. तसेच कार्यक्रम कर्जत येथील प्रती पंढरपूर येथे आयोजित करून रॅली कडाव येथून कशेले येथे पोहचली.

या रॅलीचे मार्गात कर्जत तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांनी नेरळ तसेच नेरळ कर्जत रस्ता आणि कर्जत शहर, कडाव आणि कशेले येथे स्वागत केले. या रॅली मध्ये कर्जत तालुक्यातील सर्व आदिवासी समाज सहभागी झाला होता आणि सर्व राजकीय पक्षांनी उपस्थिती लावून शुभेच्छा दिल्याबद्दल जगातील आदिवासी दिना उत्सव समिती प्रमुख परशुराम दरवडा यांनी आभार मानले.

## भाजपतर्फे ठाणेन्हावे शाळेत वह्यावाटप

**खोपोली : प्रतिनिधी**

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढिवसानिमित्त जिल्हा उपाध्यक्ष सनी यादव, अल्पसंख्याक सेलचे कर्जत खालापूर विधानसभा संयोजक मनिर धनसे यांच्या प्रयत्नातून रा.जि.प शाळा ठाणेन्हावे (उर्दु). शाळेत शालेय वस्तू व खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित इलियास धनसे, अजीम धनसे हाजी रशिद धनसे, हसन मौलाना, नियाज धनसे, अहमद खोत, मुर्तुझा धनसे, रियाज मणियार, शमशुद्दीन चाचा धनसे, वसिम तोकीर धनसे आदी उपस्थित होते.



## पाककला स्पर्धेत उर्मिला विचारे सुगरण

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या नेतृत्वाखाली कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत १८५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवुन उस्फूर्त प्रतिसाद दिला. प्रथम क्रमांक वदप येथील उर्मिला विचारे यांनी पटकावला आणि त्या स्पर्धेत सुगरण ठरल्या.



रॉयल गार्डनच्या सभागृहात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुका अध्यक्ष ॲड. रंजना धुळे यांच्या हस्ते झाले. या वेळी विधानसभा महिला अध्यक्ष ॲड. पूजा सुर्वे, शहराध्यक्ष मधुरा चंदन, माजी नगरसेविका भारती पालकर, वंदना थोरवे, छाया वेखंडे, विमल देशमुख, मनीषा ठोंबरे, मनीषा देशमुख, मनीषा पाटील, प्रभावती लोभी, निरा विचारे, वृषाली क्षीरसागर, दीपाली पिंगळे, स्मिता घुडे, प्रतिभा लोहकरे, वंदना शिंदे, मीनाक्षी शेमटे, युक्ता भोपतराव, अंकिता मोरे, प्राची तवले आदी उपस्थित होत्या.

या स्पर्धेस सुधाकर घारे, बळीराम देशमुख, राम कोळंबे, विनय वेखंडे, ॲड. स्वप्नील पालकर, संतोष थोरवे, राजन क्षीरसागर, प्रवीण देशमुख, भगवान पाटील, प्रमोद खडे आदींनी पाककृतींचा आस्वाद घेतला.

## ‘आयुष्मान भारत योजनेची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करा’

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने आयुष्मान भारत कार्ड ही शासनाची महत्वाकांक्षी योजना असून या योजनेची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शुक्रवारी येथे दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित आयुष्मान भारत कार्ड योजनेसंदर्भातील आढावा बैठकीत ते बोलत होते.

या वेळी आयुष्मान भारत कार्ड योजना मिशन समिती प्रमुख ओमप्रकाश शेट्टी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अंबादास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी श्रीमती कुचिक, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभाग पेण श्रीमती शशिकला अहिरराव,जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे आदि उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, राज्यातील कानाकोपऱ्यातील नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड योजनेचा लाभ देण्याचे शासनाचे धोरण आहे. या योजनेचा शासन निर्णय २८ जुलै २०२३ रोजी निर्गमित झाला परंतु प्रत्यक्ष कार्यवाही १ जुलै २०२४ पासून सुरु झाली आहे. पुढील दोन ते तीन महिन्यात या योजनेच्या मोफत कार्ड वाटपाचे पन्नास टक्के काम पूर्ण झाले पाहिजे अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

आयुष्मान भारत कार्ड योजना मिशन समिती प्रमुख ओमप्रकाश शेट्टी यांनीही योजनेविषयीची सविस्तर माहिती देवून उपस्थितांना मार्गदर्शन केले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे पाली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड येथील **मे. श्रुती होम्स तर्फे प्रोप्रायटर लखमन भाटेसरा** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**परीशिष्ट**
**बिनशेती शेतजमीनीचे वर्णन**
**मौजे -पाली खुर्द, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| **मे. श्रृती होम्स तर्फे प्रोप्रायटर लखमन भाटेसरा** | ९ | २/२ | १-२७-७० पो.ख. ०-०८-८० एकूण **१-३६-५०** पैकी सामजंस्य करार करुन देणार यांच्या हिश्याचे बिनशेती क्षेत्र ०-३४-५० हे आर. चौ.मी | ९.८६ |

सबब वर नमूद परीशिष्ट बिनशेती मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वैगरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक :- ०९/०८/२०२४**

**सही/-**
**विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)**
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email.vijaybhagat43@gmail.com

# कुस्तीतही भारताने जिंकले पहिले पदक

## अमन सेहरावतकडून कांस्यपदकाची कमाई



**पॅरिस : वृत्तसंस्था**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४मध्ये कुस्तीतही भारताने पहिले पदक जिंकत खाते अखेर उघडले आहे. भारताचा २१ वर्षीय तरूण पुरुष कुस्तीपटू अमन सेहरावतने शुक्रवारी (दि.९) ५७ किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकले. पॅरिस ऑलिम्पिकमधील देशाचे हे सहावे पदक आहे. अमनने कुस्तीमध्ये अमनने आक्रमक खेळी करत कांस्यपदकाच्या लढतीत पोर्तो रिकोचा कुस्तीपटू डेरियन तोई क्रूझचा तब्बल १३-५ अशा मोठ्या फरकाने पराभव केला. यासह त्याने एक ऐतिहासिक कामगिरी आपल्या नावे केली आहे.

भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारा अमन हा सर्वांत तरुण खेळाडू ठरला आहे. अमनने २१ वर्षे वय असताना ही कामगिरी केली आहे. गुरुवारी उपांत्य फेरीत अमनला जपानच्या रे युगाचीकडून पराभव पत्करावा लागला होता ज्याने ५७ किलो वजनी गटात यंदा सुवर्णपदक पटकावले आहे. कांस्यपदकाच्या लढतीत अमनचा सामना पोर्तो रिकोच्या कुस्तीपटूशी झाला. अमनने प्रतिस्पर्ध्याचा १२-५ असा पराभव केला. सामन्याच्या सुरुवातीला अमनला एकही गुण मिळाला नाही. डॅरेंटोने पहिला गुण मिळवल्यानंतर दोघांमध्ये काही काळ एका गुणासाठी चुरशीची लढत झाली. अमनने ब्रेक मारून आघाडी घेतली.

अमनने यानंतर अधिक आक्रमक खेळ केला. अमन त्याच्या आक्रमक खेळासाठी ही ओळखला जातो, त्याने आपली चढाई चालू ठेवली आणि खेळाडूला ऑरेंज रिंगकडे नेऊन पुन्हा पुन्हा गुण मिळवले. यानंतर अमनने हा सामना १३-५ असा जिंकला. अमनचे हे पदक पॅरिस ऑलिम्पिकमधील भारताचे सहावे पदक आहे. भारतातून ६ कुस्तीपटूंचा संघ पॅरिसला गेला होता. या संघात अमन हा एकमेव पुरुष कुस्तीपटू होता.

गेल्या वेळी टोकियो ऑलिम्पिकमध्ये रवी दहियाने ५७ किलो वजनी गटात रौप्य पदक जिंकले होते. यावर्षी झालेल्या चाचण्यांमध्ये अमनने रवी दहियाला मागे टाकत ५७ किलो वजनी गटात ऑलिम्पिकसाठी निवड झाली. त्याने आशियाई पात्रता फेरीत जाऊन कोटा मिळवला. निवड चाचणी घेण्यात आली नाही आणि अमन सेहरावतला थेट पॅरिसला पाठवण्यात आले.



## किकबॉक्सिंग स्पर्धेत 'सीकेटी'तील विद्यार्थ्याने पटकावले सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुणे बालेवाडी येथे नुकत्याच झालेल्या वाको-इंडिया नॅशनल चिल्ड्रन अ‍ॅण्ड कॅडेटस किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थी वरद कृष्णत काळंगे याने सुवर्णपदक पटकावले. याबद्दल त्याची हंगेरी येथे होणाऱ्या वर्ल्ड चॉम्पियनशिप स्पर्धेत निवड झाली आहे.

याचबरोबर पनवेल महापालिका आयोजित किकबॉक्सिंग चॉम्पियनशिप या स्पर्धेतही वरद काळंगे याने सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

या यशाबद्दल संथेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेच्या संचालक वर्षा ठाकूर, सचिव डॉ. एस.टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी वरदचे अभिनंदन करून त्याला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## पलक खरातची राष्ट्रीय लाठी स्पर्धेसाठी निवड



**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील एलएईएस शाळेची विद्यार्थिनी असलेली पलक खरात हिने आळंदी (जि.पुणे) येथे झालेल्या राज्यस्तरीय लाठी (सिलंबम) स्पर्धेत स्टिक रोटेशन आणि स्किक फाईट या क्रीडा प्रकारात कांस्यपदक जिंकले. त्यामुळे पलकची तामिळनाडू येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

आळंदी येथे झालेल्या राज्यस्तरीय लाठी स्पर्धेसाठी पलक खरातची रायगड जिल्हा संघातून निवड झाली होती. राज्यस्तरीय स्पर्धेत पलकने स्टिक रोटेशन आणि स्किक फाईट या क्रीडा प्रकारात १४ ते १७ वयोगटात सहभाग घेतला होता. पलकने चांगला खेळ करीत कांस्यपदक प्राप्त केले. या कामगिरीच्या जोरावर तिची तामिळनाडू येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्यस्तरीय यशाबद्दल व राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र लाठी असोसिएशनचे अध्यक्ष पाष्या अत्तर, मुंबई विभाग आणि ठाणे जिल्हा अध्यक्ष बाळा साठे, दिपाली साठे यांनी पलकचे अभिनंदन केले. त्याचबरोबर प्रशिक्षक स्वप्नील अडूरकर, मोहिनी अडूरकर आणि सौरभ खरात यांनी तसेच एलएईएस शाळेच्या मुख्याध्यापिका अजिता नायर यांनी पलकचे कौतुक करून तिला शुभेच्छा दिल्या.

## अर्शद नदीमला शुभेच्छा देणे बाबर आझमला पडले महागात




**पॅरीस : वृत्तसंस्था**

तब्बल चार दशकांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर पाकिस्तानच्या अर्शद नदीमने भालाफेक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून इतिहास घडवला. त्यांच्या या ऐतिहासिक विजयानंतर सोशल मीडियावर त्यांचे अभिनंदनाच्या पोस्ट सर्वांनीच शेअर केल्या. यामध्ये पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमच्या नावाचाही समावेश आहे.

बाबरने अर्शदचे फोटो एक्सवर शेअर करीत त्याला शुभेच्छा दिल्या आहेत. पोस्टच्या कॅप्शनमध्ये बाबर आझमने लिहिले की, ३० वर्षांनंतर पाकिस्तानमध्ये सुवर्णपदक परतले आहे. या महान कामगिरीबद्दल अर्शद नदीमचे खूप खूप अभिनंदन. तुम्ही संपूर्ण देशाला अभिमान बाळगण्याची संधी दिली आहे, मात्र या पोस्टमुळे पाकिस्तान क्रिकेट संघाचा कर्णधार खूप ट्रोल होत आहे. बाबर आझमने या पोस्टमध्ये चुकीच्या अर्शद नदीमला टॅग केले आहे. त्यामुळे तो चांगलाच ट्रोल आहे. चाहत्यांनी त्याला त्याची चूक लक्षात आणून दिली.

## पनवेल महापालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत पनवेल महापालिका आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल महापालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २१ ऑगस्ट रोजी नवीन पनवेल सेक्टर १८ येथील सिडको समाज मंदिरात शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते माजी टेबल टेनिसपटू संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा व सांस्कृतिक उपायुक्त बाबासाहेब राजळे, रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख नामदेव पिचड, समीर रेवाळे यांच्या हस्ते २१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता करण्यात येणार आहे.

स्पर्धा स्वेदलिंग कप या पद्धतीने १४, १७, १९ वर्षांखालील मुले व मुले अशा गटात घेण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रत्येक संघात कमीत कमी तीन खेळाडू असणे बंधनकारक आहे तसेच स्पोर्ट्स शुज परिधान करणे अत्यावश्यक आहे.

स्पर्धेचे चिफ रेफरी पराग अंकोलेकर व असिस्टंट चिफ रेफरी म्हणून शामल डेब्बार्मा यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संजय कडू यांच्यातर्फे विजयी संघांना आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार आहे.

## राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेमध्ये पनवेल-रायगडच्या खेळाडूंची कामगिरी

**उरण : बातमीदार**



गोवा येथे झालेल्या वाको इंडिया सीनियर नॅशनल किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२४ स्पर्धेत पनवेल शहर किकबॉक्सिंग असोसिएशनच्या सुयश पवारने महाराष्ट्र कोच व मुख्य प्रशिक्षक निलेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली किकलाईट -७४ किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावले.

त्याचप्रमाणे अनुज भोसले यांनी किकलाईट -८९ किलो वजनी गटात रौप्यपदक व लाइट काँटॅक्ट -८९ किलो वजनी गटात कांस्यपदक, चिराग शिवगण याने किकलाईट +९४ किलो प्रकारात रौप्यपदक, आर्यन शिवतरकर किकलाईट -९४ किलो प्रकारात कांस्यपदक, फाल्गुनी दकोलीया लो-किक -४८किलो प्रकारात रौप्यपदक पटकाविले, तर हर्षदा मोकल हिला पाचव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

या सर्व खेळाडूंचे वाको इंडियाचे अध्यक्ष संतोष कुमार अग्रवाल आणि वाको महाराष्ट्रचे अध्यक्ष निलेश शेलास व पनवेल शहर किकबॉक्सिंग असोसिएशन सचिव मंदार पनवेलकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी मार्गदर्शन केले.

### राष्ट्रीय पुरुष व महिला बीच कबड्डी स्पर्धा

## महाराष्ट्र दोन्ही गटात बाद फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**




महाराष्ट्राच्या पुरुष व महिला या दोन्ही संघांनी ११व्या राष्ट्रीय बीच कबड्डी स्पर्धेच्या बाद फेरीत प्रवेश केला.

पुरुषांनी शेवटच्या दोन्ही सामन्यात चुरशीची लढत देत बाद फेरीचा मार्ग मोकळा केला, तर महिलांना शेवटच्या साखळी सामन्यात हरियाणा कडून ४६-२७ असा दारुण पराभव पत्करावा लागला. महिलांच्या गटात ३ संघ असल्याने त्यांनी रात्री उशीरा झालेल्या सामन्यात आंध्र प्रदेशचा ४७-२७ असा पराभव करीत बाद फेरी गाठली. विश्रांतीला २४-१४ अशी अधाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने नंतर देखील खेळातील जोश कायम राखत २० गुणांच्या मोठ्या फरकाने हा सामना जिंकला. आम्रपाली गलांडे, जुईली मिस्किटा यांच्या चढाई-पकडीच्या खेळाला याचे श्रेय जाते. हरजीत संधूने देखील एकाच चढाईत ३ गडी टिपत त्यांना छान साथ दिली.

महाराष्ट्राने दुसऱ्या सामन्यात तामिळनाडूचे कडवे आव्हान ३६-३४असे परतवून लावत हा विजय मिळविला. मध्यांतराला १९-१५ अशी महाराष्ट्राकडे आघाडी होती, तर शेवटच्या साखळी सामन्यात आंध्र प्रदेशचे आव्हान ३५-३० असे संपुष्टात आणत या गटात अपराजित रहाण्याची किमया साधली. आकाश शिंदे, सुनील दुबिले यांच्या आक्रमक चढाया त्याला ऋषिकेश भोजने, शंकर गदई यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे हे दोन्ही विजय शक्य झाले. उपांत्यपूर्व फेरीत पुरुषांची गाठ यजमान बिहारशी, तर महिलांची गाठ उत्तराखंडशी पडेल.

## विनोद कांबळींनी स्वतःच दिली आपल्या तब्येतीची माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला होता. हा व्हिडीओ पाहून विनोद कांबळींचे चाहते हळहळले होते. एकेकाळी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूला नीट उभे राहता येत नाही, चालता येत नाही, हे पाहून चाहत्यांना वाईट वाटले होते, मात्र हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर आता खुद्द विनोद कांबळींनीच त्यांच्या प्रकृतीविषयी माहिती दिली आहे.

विनोद कांबळीचा व्हिडीओ पाहून व्यथित झालेले त्याचे दोन शालेय मित्र रिकी आणि त्यांचा भाऊ मार्कस कौटो कांबळीला भेटण्यासाठी त्याच्या वांद्रे येथील निवासस्थानी पोहोचले. तिथे पोहचल्यानंतर त्यांना धक्काच बसला. ज्या विनोद कांबळीचा व्हिडीओ पाहून ते हळहळले होते, तो आपला मित्र एकदम धडधाकट त्यांच्या स्वागतासाठी उभा असल्याचे पाहून त्यांना सुखद धक्का बसला.

टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, मार्कस कौटो यांनी विनोद कांबळीच्या घरी जाऊन त्याच्या प्रकृतीविषयी चौकशी केली. या वेळी विनोद कांबळी अंगठा दाखवत म्हणाला, मी ठीक आहे. देवाच्या कृपेने सगळे काही व्यवस्थित सुरू आहे. मी सुखरूप आणि अगदी ठणठणीत आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com